दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिद्ध
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २०६ I रविवार १० मे २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## आता तुम्ही कशाला ह्या संसारात आला?



'सहजयोग'
भाग ४८

तर परमेश्वराला जाणण्यासाठी ! परमेश्वराने ही सर्व सृष्टी केली, तुम्हाला सगळं काही दिलं, शेवटी एवढ्यासाठी की तुमच्यामध्ये सुजाणता यावी, तुमच्यामध्ये धर्म यावा आणि नंतर तुम्ही त्या धार्मिक स्थितीमध्ये परमेश्वराशी एकात्म व्हा. केवळ या जीवाचा आणि आत्म्याचा संबंध होतो. तुम्ही त्या परम पित्या परमात्म्याच्या साम्राज्यात प्रवेश करावा म्हणूनच परमेश्वराने ही सगळी रचना केलेली आहे आणि तो आतुरतेने तुमची वाट बघतो आहे की हे कधी माझ्याकडे येणार, पण तुम्ही पैसे मिळाले म्हणून इकडे बहकले, सत्ता मिळाली म्हणून तिकडे बहकले. तुमच्याजवळ एवढासुद्धा वेळ नाही की तुम्ही दोन मिनिटं परमेश्वराच्याबद्दल विचार कराल. पाश्चिमात्य देशातील लोकांनी सगळे हेच प्रकार केले. रात्रं- दिवस धडपड करून हे कर रे, ते कर रे, पैसे एकत्र कर रे, काय काय त्यांना जे करायचे ते करून शेवटी काय झालं? त्यांच्या मुलांनी आपल्या आई-वडिलांचं घर सोडलं. तुम्ही सांभाळा ते आणि ते लागले आपल्या मार्गाला आणि ते कुठे जाऊन पोहोचले तर त्यांनी हे सगळं तऱ्हेतऱ्हेच्या व्यसनांची सुरुवात केली. आता तुम्हालाही त्या रस्त्याने जायचे असले तर जा. त्याला कोणी काही मना करू शकत नाही. तुम्ही म्हणाल की आम्हाला नरकात जायचंय तर जा. सरळ जाऊ शकता. पण जर तुम्ही समजलात की, 'मी कोण आहे? कशासाठी आलो आहे या जगात? मला काय काय करायचे आहे ? आणि माझी काय स्थिती आहे, वस्तुस्थिती काय आहे ?' हे जर तुमच्या लक्षात आलं तर मात्र तुम्ही अधोगतीला न जाता सहजयोगाकडे याल.

– ०३ फेब्रुवारी १९८२ राहुरी अधिक माहितीसाठी

www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## संतांचा घुसखोर म्हणून उल्लेख....

# विकास लवांडे यांना काळे फासले!


## कीर्तनकार संग्राम भंडारे यांच्यासह दहा ते पंधरा जणांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर शनिवारी शाईफेक करण्यात आली. वारकरी आणि हभप संग्राम भंडारे महाराज यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी लवांडे यांना एका ठिकाणी गाठून त्यांच्या अंगावर काळी शाई ओतली. या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यामध्ये दहा ते पंधरा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मात्र, मला ठार मारण्याचा प्रयत्न होता, संग्राम भंडारेंकडे पिस्तुल होते, त्याचा धाकही मला दाखवल्याचे विकास लवांडे यांचा दावा आहे. वारकऱ्यातील नथुराम गोडसे अर्थात गुंड संग्राम भंडारे आणि काही १०/१५ गुंड गोरक्षक यांनी तीन फोर व्हीलरमध्ये आले होते. आज माझे आळंदी मातोबाची तालुका हवेली येथे प्रवचन संपल्यानंतर आता १० वाजता मी परतत असताना माझी गाडी अडवून माझ्या अंगावर शाई ओतली आणि मला धक्काबुक्की केली पिस्तूल दाखवला आहे. नंतर पळून गेले. त्या निषेधार्थ मी लोणी काळभोर पोलीस स्टेशनला फिर्याद देण्यासाठी आलो आहे. पुणे पोलीस आयुक्तांनी ताबडतोब त्या सर्व माझ्यावर हल्ला करणाऱ्या गुंडांचा कायदेशीर बंदोबस्त करावा. तोपर्यंत मी लोणी काळभोर पोलीस स्टेशन येथे सत्याग्रह करत आहे, असे विकास लवांडे यांनी म्हटले आहे.

यापुकरणी, पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मात्र, याप्रकरणात, हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी विकास लवांडे यांनी केली. त्याच अनुषंगाने राष्ट्रवादीचे आमदार



रोहित पवार यांनीही पोलीस ठाण्यात जाऊन कलम वाढवण्याची मागणी केली. तसेच, आमच्या मागणीनुसार कलम वाढवण्यात न आल्यास सोलापूर हायवेवर रास्तारोको आंदोलन करणार असल्याचा इशाराही रोहित पवार यांनी दिला.

विकास लवांडे यांच्यावरील हल्लाप्रकरणात गुन्हा दाखल झालाय पण खुनाचा प्रयत्न हे कलम लावलेलं नाही. आम्ही दोन दिवसात चौकशी करून अधिकची माहिती देतो. जर आमच्या मागणीनुसार कलम नाही लागलं तर आम्ही दोन दिवसांनी सोलापुर हायवेवर रास्तारोको करू, असा इशाराच रोहित पवार यांनी दिली. तसेच, हा हल्लेखोर भोंदू स्वत:ला महाराज म्हणवतो मग शिव्या कशा देतो? वारकरी सांप्रदायतले हे घुसखोर जे आहेत त्यांच्या विरोधात आमचा लढा सुरूच राहणार, आम्ही पोलिसांना तपासासाठी दोन दिवस देतो, नंतर मग आम्ही गप्प बसणार नाही, असेही रोहित पवार (पान ४ वर)

### 'विकास लवांडे पिस्तुल लावण्याच्या पात्रतेचा नाही'

हा विकास लवांडे गेल्या अनेक दिवसांपासून ज्या गुरुवर्यांनी मला हिंदू धर्माची शिकवण दिली, आम्हाला लहानाचं मोठं केलं, त्यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान करत असेल तर, त्यांना घुसखोर आणि धर्मांध म्हणत असेल तर आम्ही ते कसं सहन करु. गेल्या अनेक दिवसांपासून तो आमच्या वारकरी संप्रदायावर टीका करत आहे, आरोप करतोय. आमच्यासारख्यांना काय भिडायचंय ते भिडावं ना, पण आमच्या गुरुवर्यांवरील टीका आम्ही सहन करु शकत नाही. 'गुरु हा संतकुळीचा राजा, गुरु हा प्राण विसावा माजा, गुरु विन देव दुजा पाहता नाही त्रैलोक्या.' त्यामुळे विकास लवांडेच्या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी आम्ही त्याच्यावर काळी शाई ओतली. बाकी तो जे खोटारेड आरोप करतोय, मला पिस्तुल लावलं, गुंड उभे केले, त्याची एवढी लायकी नाही की त्याला पिस्तुल लावावी. 'तुका म्हणे संता पिडतील खळ, घेती तोंड काळे करुनिया', आम्ही त्याचे तोंड काळे केले आहे. आम्ही चांगल्याला चांगले, वाईट आहोत. आम्ही शिवछत्रपतींचे मावळे आहोत आणि ज्ञानेश्वर-तुकोबांचे वारकरी आहोत. आम्ही आता काळी शाई ओतून त्याचा निषेध केला आहे. यापुढे त्याने आमच्या गुरुवर्यांचा अपमान केला तर विकास लवांडे यांनी यापुढच्या प्रसंगांना सामोरे जायची तयारी ठेवावी, असा इशारा भंडारे यांनी दिला.

### आ. संग्राम जगतापांकडून कीर्तनकार भंडारेंचे जाहीर समर्थन

**मी हभप संग्राम बापू भंडारे यांचे अभिनंदन करतो आणि समर्थ देखील करतो. त्यांनी अत्यंत उत्कृष्ट प्रकारे आपल्या भावना व्यक्त केल्यात. त्यांनी जे केले त्या मागची भूमिका आपण लक्षात घेतली पाहिजे. महाराष्ट्राची आणि देशाची एक वेगळी परंपरा आहे. या परंपरेमध्ये आपल्या धर्माची पताका घेऊन जात असताना अनेक लोकांनी आपलं संपूर्ण जीवन धर्माकरिता समर्पित केले आहे. मात्र कोणीतरी उठतो आणि एखाद्या अधिकाऱ्यांसारखी यादी वाचतो. त्यामुळे बापूंनी जे केलेले आहे, त्याचे आम्ही हिंदुत्ववादी कार्यकर्ते म्हणून संपूर्ण महाराष्ट्राच्या वतीने अभिनंदन करतो. त्यांनी अत्यंत योग्य भूमिका बजावली. या लोकांना हिंदू धर्माविरोधात बोलायला कोण सांगत हे देखील लोकांसमोर यायला हवं,.**

**– आ. संग्राम जगताप**

### लवांडे यांच्या केसालाही धक्का लागला तर...

विकास लवांडे यांच्या केसालाही धक्का लागला तर त्याची पूर्ण जबाबदारी ही पोलीस प्रशासनाची राहील, याची सरकारने नोंद घ्यावी. या हल्ल्याच्या निमित्ताने एक गोष्ट स्पष्ट झाली ती म्हणजे दुसऱ्या राज्यातून येऊन अनेक भोंदूबाबा जगदुरु संत तुकाराम महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीमाई फ ुले, छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी चुकीचं आणि आक्षेपार्ह बोलतात त्यावेळी हे भोंदू मूग गिळून बिळात लपून बसतात. आजच्या हल्ल्याने बंधूभाव, शांतता आणि समता प्रस्थापित करणाऱ्या वारकरी संप्रदायात स्वत:ला वारकरी म्हणून घेणाऱ्या कट्टरतावादी गुंडांनी घुसखोरीच केली, हे सिद्ध झाले. त्यामुळे भविष्यात संतांचा खरा विचार जपण्यासाठी या घुसखोरांविरोधात संघर्ष करण्याची वेळ आली, हे सर्वांनीच लक्षात घेण्याची गरज आहे.

**– आ. रोहित पवार**

## श्रीरामपूरात केमिकलयुक्त दुधाचा पुरवठा !

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर शहरातील वॉर्ड क्रमांक १ परिसरात कृत्रिम व केमिकलयुक्त दूध विक्री होत असल्याचा आरोप समोर आला असून सामाजिक कार्यकर्ते रियाज पठाण यांनी सोशल मीडियावर व्हिडीओ प्रसारित केल्यानंतर शहरात खळबळ उडाली आहे.

### सोशल मीडियावरील व्हिडीओमुळे खळबळ

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी रियाज पठाण यांनी मदर तेरेसा परिसरातून सुट्टे दूध खरेदी केले होते. हे दूध घरी आणून तापवण्यासाठी पातेल्यात ठेवले असता त्यामध्ये पाणी आणि घट्ट पदार्थ असे दोन वेगळे थर दिसून आल्याचा दावा करण्यात आला आहे.



तसेच चमच्याने दूध हलवून पाहिले असता त्यामध्ये केमिकलयुक्त सायसदृश पदार्थ आढळल्याचे त्यांनी व्हिडीओमध्ये म्हटले आहे. या प्रकारामुळे शहरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून दूध भेसळीच्या वाढत्या घटनांमुळे आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषत: लहान मुले, वृद्ध नागरिक आणि रुग्णांच्या आरोग्यासाठी हे धोकादायक असल्याची भावना व्यक्त होत आहे. (पान ४ वर)

## विनेश फोगाटवर भारतीय कुस्ती महासंघाची बंदी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** भारतीय कुस्ती महासंघाने ऑलिम्पिक कुस्तीपटू विनेश फोगाटवर २६ जूनपर्यंत देशांतर्गत स्पर्धांमध्ये भाग घेण्यावर बंदी घातली आहे. थऋख ने विनेशला नोटीस बजावली असून थऋख चे नियम, उत्तेजक द्रव्य विरोधी नियम आणि आंतरराष्ट्रीय कुस्ती नियमांचे उल्लंघन केल्याचे म्हटले आहे. थऋख ने म्हटले आहे की, विनेश तिच्या निवृत्तीची सहा महिन्यांची पूर्वसूचना देण्यात अपयशी ठरली आहे.

विनेशच्या वागणुकीमुळे देशाला लाजिरवाणे वाटले असून भारतीय कुस्तीची प्रतिमा डागाळली आहे. वजन जास्त असल्याचे आढळल्याने विनेश फोगाटला ऑगस्ट २०२४ मध्ये होणाऱ्या पॅरिस ऑलिम्पिकसाठी अपात्र ठरवण्यात आले होते. तेव्हा तिने कुस्तीतून निवृत्ती जाहीर केली होती. तथापि, नंतर तिने आपला निर्णय मागे घेतला.

दुसरे म्हणजे, या महिन्याच्या ४ मे रोजी, आंतरराष्ट्रीय चाचणी संस्थेने (खढअ) १८ डिसेंबर २०२५ रोजी बंगळूरु येथे डोपिंग चाचणी देण्यास अपयशी ठरल्याबद्दल विनेश फोगाटला नोटीस बजावली होती. गेल्या आठवड्यात, माजी अध्यक्ष बृजभूषण सिंह यांच्यावर आरोप केले होते. ३ मे रोजी विनेश फोगटने डब्ल्यूएफआयचे (पान ४ वर)

## निदा खानला लपवणाऱ्या मतीन पटेलच्या मोबाईलमध्ये ३० अश्लील व्हिडिओ

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**संभाजीनगर :** नाशिक धर्मांतर प्रकरणातील आरोपी निदा खानला आश्रय दिल्याप्रकरणी एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांच्यावरील कारवाईचा फास आणखी आवळला जात आहे. पोलिसांनी निदा खानला अटक केल्यानंतर तिला लपवणारा नगरसेवक मतीन पटेल पोलिसांच्या रडारवर आहे. अशातच पटेल याने एमआयएमचे प्रमुख ओवेसी यांच्या स्वागताचे शहरभर बॅनर लावल्याने चर्चेचा विषय ठरला. त्यातच मतीन पटेल च्या मोबाईल मध्ये महिलांचे ३० अश्लील चित्रीकरणाचे व्हिडिओ असल्याचा आरोप उपमहापौरांनी केल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

महानगरपालिकेने त्यांच्या घर आणि कार्यालयावर अनधिकृत बांधकामाची





नोटीस बजावत पाडकामाचा इशारा दिलाय. उपमहापौर राजेंद्र जंजाळ यांनी मतीन पटेल यांच्या मोबाईलमध्ये म हिलांचे अश्लील व्हिडिओ असल्याचा आणि ब्लॅकमेलिंगचा गंभीर आरोप केला आहे. तसेच आगामी महासभेत त्यांचे नगरसेवक पद रद्द करण्याची मागणी करणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. म तीन पटेल फक्त मोहरा असून यामागे मोठं जाळं कार्यरत आहे, असा गंभीर इशाराही जंजाळ यांनी दिला.

दरम्यान, मतीन पटेल याना छत्रपती संभाजी नगर महापालिकेने दणका दिला आहे. त्यांच्या घरावर आता बुलडोझर कारवाई करण्यात येणार आहे. ज्या घरात निदा लपलेली होती ते घर बेकायदेशीर अतिक्रमण करून बांधलं असल्याची नोटीस माहापालिकेकडून देण्यात आलीय. ३ दिवसात खुलासा न केल्यास घर पाडण्यात येईल असा इशारा देखील महापालिकेकडून देण्यात आलाय. त्याचबरोबर त्यांचं नारेगाव परिसरातील दुसरं राहते घर आणि नारेगाव परिसरातील त्यांच्या ऑफिसला ही अतिक्रमण केल्या संदर्भातली नोटीस बजावण्यात आली आहे.



### विजय थलपती आज घेणार मुख्यमंत्रीपदाची शपथ

**चेन्नई :** तामिळनाडूमध्ये, टीव्हीकेचे प्रमुख विजय थलपती उर्फ सी. जोसेफ विजय आज (१० मे) रविवारी राज्याचे नववे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. नवीन सरकारचा शपथविधी सोहळा चेन्नई येथील जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियममध्ये सकाळी १० वाजता सुरू होईल. विजय यांनी लोक भवन येथे राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ अर्लेकर यांची भेट घेतली आणि सरकार स्थापन करण्यासाठी १२१ आमदारांची पाठिंब्याची पत्रे सादर केली. बहुमत सिद्ध करण्यासाठी ११८ आमदारांच्या बहुमताची आवश्यकता होती. आज (९ मे) व्हीसीके आणि आययूएमएलने प्रत्येकी दोन आमदारांसह टीव्हीकेला आपला पाठिंबा दर्शवला.

## भूत काढण्याच्या नावाखाली महिलेचे पैसे, दागिने लुटले

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

### टाकळीभान येथील आढाव बाबाला अटक; दोन दिवसांची पोलीस कोठडी

**श्रीरामपूर :** टाकळीभान येथील अशोक मधुकर आढाव यास श्रीरामपूर तालुका पोलिसांनी एका महिलेच्या तक्रारीवरून अटक केली असून न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, सन २०२३ मध्ये ती भूतबाधा झाल्याच्या कारणावरून उपचारासाठी आरोपी बाबाकडे गेली होती. यावेळी बाबाने तिला बरे करण्याचे आमिष दाखवत वेळोवेळी तिच्याकडून रोख रक्कम व सोन्याचे दागिने घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच २०२५ मध्ये एका प्रसंगी महिलेबरोबर गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केल्याचीही तक्रार पोलिसांत दाखल करण्यात आली आहे.या प्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलिसांनी गुन्हा रजिस्टर क्रमांक १४३/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५ तसेच अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. आरोपी अशोक आढाव याला अटक करून श्रीरामपूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले. सरकार पक्षाने तपासासाठी पोलीस कोठडीची मागणी केली होती. आरोपीतर्फे ॲड. आरिफ शेख व ॲड. जावेद शेख यांनी बाजू मांडत आरोप फेटाळले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीस दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

# १३ वर्षीय ओंकारला कारखाली चिरडले!

## गुरुवारी झालेल्या अपघातानंतर शनिवारपर्यंत आरोपी फरारच

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**राहाता :** आजीसोबत आनंदाने डफचा खेळ पाहण्यासाठी निघालेल्या १३ वर्षीय ओंकार गायकवाड या चिमुकल्याचा भरधाव कारच्या धडकेत दुर्दैवी मृत्यू झाला. मात्र हा केवळ अपघात नसून चालकाने जाणीवपूर्वक गाडी रिव्हर्स घेऊन ओंकारच्या अंगावरून चाक फिरवल्याचा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या घटनेमुळे राहाता शहरात संतापाची लाट उसळली असून ग्रामस्थांनी मृतदेह थेट राहाता पोलीस ठाण्यासमोर आणत ठिय्या आंदोलन केले.

गुरुवारी रात्री साडेनऊच्या सुमारास ओंकार आपल्या आजीसोबत शनी चौक परिसरात डफचा खेळ पाहण्यासाठी जात होता. कृष्ण मंदिराजवळ वळण घेत असताना भरधाव अर्टिगा कारने आधी आजीला व नंतर ओंकारला

### संतप्त ग्रामस्थांचे पोलीस ठाण्यासमोर आंदोलन



जोरदार धडक दिली. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, ओंकार खाली पडल्यानंतर चालकाने गाडी मागे-पुढे घेत त्याच्या पोटावरून चाक फिरवले. या अमानुष प्रकारामुळे उपस्थित नागरिक हादरले. गंभीर जखमी अवस्थेत ओंकारला प्रथम शिर्डी व नंतर नाशिक येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असताना शनिवारी सकाळी त्याची प्राणज्योत मालवली. आमचा नातू एकुलता एक होता, आमचे कोणाशीही वैर नव्हते, मग त्याच्यावर इतका निर्दयी हल्ला का करण्यात आला? असा आर्त सवाल आजोबा पांडुरंग गायकवाड यांनी केला.

घटनेनंतर पोलिसांनी सुरुवातीला गांभीर्य दाखवले नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. संबंधित कारची फुटलेली काच पोलीस ठाण्यात आढळल्याने संशय अधिक बळावला आहे. संतप्त नागरिकांनी पोलीस ठाण्यासमोर जोरदार आंदोलन करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणातील तीन संशयितांना ताब्यात घेतले असून रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. शनिवारी रात्री राहाता येथील अमरधाममध्ये ओंकारवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

### पोलिसांच्या भूमिकेची चौकशी करा

**नशेत गाडी चालवणाऱ्या चालकाने निष्पाप ओंकारला चिरडून ठार मारले, हा केवळ अपघात नसून माणुसकीचा खून आहे. घटनेनंतर गावकऱ्यांनी वारंवार माहिती देऊनही पोलिसांनी गांभीर्याने दखल घेतली नाही, असा आरोप करत भाजप नेते डॉक्टर राजेंद्र पिपाडा यांनी पोलीस निरीक्षक नितीन चव्हाण यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी केली. दोषींवर कठोर कारवाई तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन निवेदन देणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.**

# संपादकीय

## वाचाळ राजकारणामुळे सामाजिक सहिष्णुता धोक्यात

महाराष्ट्राची ओळख ही संतांची, विचारांची आणि सहिष्णुतेची राहिली आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ यांच्या वारकरी परंपरेने समाजाला एकत्र ठेवण्याचे काम केले. जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन विठ्ठल या एका श्रद्धेतून सामाजिक एकात्मता निर्माण करण्याचे कार्य वारकरी संप्रदायाने शेकडो वर्षे केले. त्यामुळेच महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाकडे केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक समन्वयाची चळवळ म्हणून पाहिले जाते. अशा संप्रदायाबाबत राजकीय पातळीवरून सातत्याने वादग्रस्त वक्तव्ये होणे आणि त्यातून संघर्ष निर्माण होणे ही चिंतेची बाब आहे.

शरद पवार यांनी वाढत्या धार्मिक आणि जातीय तणावावर भाष्य करताना वारकरी संप्रदायात कट्टर पंथीयांची घुसखोरी झाल्याचे विधान केले. त्यानंतर विकास लवांडे यांनी अधिक आक्रमक भूमिका घेत काही संत-महंतांची नावे घेऊन त्यांच्यावर थेट आरोप केले. या वक्तव्यामुळे राज्यभरातून संतापाची लाट उसळली. निषेध आंदोलने झाली. वारकरी संप्रदायातील अनेकांनी या वक्तव्यांचा निषेध करत गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. शेवटी आळंदी परिसरात लवांडे यांच्यावर शाही फेकण्याची घटना घडली आणि हा वाद अधिक चिघळला.

लोकशाहीत अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे. मात्र त्या स्वातंत्र्याची मर्यादा आहे. टीका करणे आणि अपमान करणे यामध्ये सूक्ष्म पण महत्त्वाचा फरक असतो. कुठल्याही धर्मातील श्रद्धास्थानांवर किंवा धार्मिक नेत्यांवर बेछूट आरोप केल्यास त्यातून समाजात तणाव निर्माण होतो. महाराष्ट्राने यापूर्वीही अशा अनेक घटना पाहिल्या आहेत.

काही वर्षांपूर्वी इतिहासकार आणि लेखक जेम्स लेन यांच्या पुस्तकातून छत्रपती शिवाजी महाराजांबाबत आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध झाला होता. त्यावेळी संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला. भांडारकर संस्थेवर हल्ला झाला. हा संताप चुकीच्या पद्धतीने व्यक्त झाला असला तरी त्यामागील भावना समाजाच्या श्रद्धांशी निगडित होत्या. त्यानंतर सोशल मीडियावरून वारंवार संत, महापुरुष किंवा धर्मांबाबत आक्षेपार्ह पोस्ट टाकून वातावरण बिघडवण्याचे प्रकार घडले.

अहिल्यानगर, कोल्हापूर, सांगली, धुळे अशा अनेक ठिकाणी धार्मिक पोस्ट, मिरवणुकीतील घोषणाबाजी किंवा सोशल मीडियावरील टिप्पणीमुळे दंगलीसदृश परिस्थिती निर्माण झाल्याची उदाहरणे आहेत. २०१८ मधील भीमा-कोरेगाव प्रकरणातही सुरुवातीला वादग्रस्त भाषणांमुळे तणाव वाढला आणि त्याचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटले. त्याचप्रमाणे काही वर्षांपूर्वी नुपूर शर्मा प्रकरणावरून देशभरात धार्मिक भावना भडकल्या होत्या. एका वक्तव्यामुळे किती मोठा सामाजिक संघर्ष निर्माण होऊ शकतो, हे त्या घटनेतून स्पष्ट झाले.

मुळात धार्मिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींनी राजकीय भूमिका घेऊ नये, असा कोणताही कायदा नाही. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये विविध धर्मगुरूंनी उघडपणे भूमिका घेतल्याची अनेक उदाहरणे आहेत. मुस्लिम धर्मगुरूंनी फतवे काढले, प्रचार सभा घेतल्या, तसेच हिंदू संतांनीही काही पक्षांना पाठिंबा जाहीर केला. हा त्यांचा वैयक्तिक अधिकार आहे. त्यामुळे केवळ एखादा संत किंवा महंत एखाद्या राजकीय भूमिकेत दिसला म्हणून त्याला घुसखोर म्हणणे योग्य नाही.

आजची सर्वात मोठी समस्या म्हणजे राजकीय फायद्यासाठी धार्मिक प्रश्नांना मुद्दाम हवा देणे. सोशल मीडियामुळे ही आग आणखी वेगाने पसरते. एखाद्या वक्तव्याचा छोटासा व्हिडिओ व्हायरल होतो आणि समाजात संशय, द्वेष आणि संघर्ष निर्माण होतो. अनेकदा राजकीय नेते स्वतः प्रसिद्धीसाठी वादग्रस्त वक्तव्ये करतात. त्यातून समर्थक आणि विरोधकांमध्ये संघर्ष वाढतो. सामान्य माणसाचे प्रश्न मात्र मागे पडतात.

विकास लवांडे प्रकरणातही हेच दिसून येते. त्यांनी केलेल्या वक्तव्यांमुळे वारकरी समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या. त्याचवेळी त्यांच्यावर शाही फेकणे किंवा धमक्या देणे हेही योग्य ठरत नाही. कायदा हातात घेणे हा उपाय असू शकत नाही. निषेध लोकशाही मार्गाने व्हायला हवा. मात्र अशा घटना घडतात, याचा अर्थ समाजातील सहनशीलता कमी होत चालली आहे.

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय हा संयम, समता आणि सहिष्णुतेचा संदेश देणारा आहे. ज्ञानबा-तुकारामच्या नावाने लाखो लोक दरवर्षी वारी करतात. त्या परंपरेला राजकीय संघर्षाचे रूप देणे धोकादायक आहे. संतांच्या नावावरून समाज विभागला गेला तर महाराष्ट्राच्या सामाजिक ऐक्याला मोठा धोका निर्माण होईल.

आज गरज आहे ती जबाबदार राजकारणाची. राजकीय नेत्यांनी मतांसाठी धार्मिक भावना भडकवण्याचे प्रकार थांबवले पाहिजेत. धार्मिक क्षेत्रातील व्यक्तींनीही संयम राखला पाहिजे. समाजमाध्यमांवर द्वेष पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नागरिकांनीही विवेकाने वागणे गरजेचे आहे. प्रत्येक वादाला धर्म आणि जातीय रंग दिला गेला, तर समाजात कायम संशय आणि अस्थिरता निर्माण होईल.

महाराष्ट्राची खरी ताकद ही त्याच्या सहिष्णु संस्कृतीत आहे. येथे हिंदू, मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, जैन, शीख सर्वजण एकत्र राहतात. सामाजिक आणि आर्थिक नात्यांनी हा समाज जोडलेला आहे. काही मोजक्या वाचाळ वक्तव्यांमुळे ही एकता तुटता कामा नये. विकास लवांडे यांच्यासारख्या कार्यकर्त्यांनी स्वतःवर संयम ठेवणे आवश्यक आहे. त्याचवेळी राजकीय पक्षांनीही केवळ राजकीय लाभ न पाहता समाजहिताची भूमिका घेणे गरजेचे आहे. अन्यथा वादग्रस्त वक्तव्यांची ही साखळी महाराष्ट्राच्या सामाजिक स्वास्थ्यासाठी गंभीर संकट ठरू शकते.

# एकीचे बळ आणि लोकसहभागातून पानेगांवात अवतरली विकासगंगा

## समृद्ध पंचायतराज अभियान समितीकडून पाहणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पानेगांव** : नेवासे तालुक्यातील पानेगांव येथे दि.८ रोजी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान योजनेत पानेगांव ग्रामपंचायतीने गेल्या वर्षभरात केलेल्या विविध विकासकामांची, तसेच नावीन्यपूर्ण उपक्रमांची अधिकाऱ्यांच्या समितीने प्रत्यक्ष पाहणी केली. बीड जिल्ह्यातील माजलगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती ढाले, विस्तार अधिकारी गायकवाड यांच्या समितीने विविध कामांची तपासणी केली. यावेळी नेवासे पंचायत समितीचे अतिरिक्त गटविकास अधिकारी बाळासाहेब कासार, शेळके भाऊसाहेब उपस्थित होते. सप्टेंबर पासून सुरू झालेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात पानेगांव ग्रामपंचायतीने सुशासनयुक्त पंचायत, गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण, लोकसहभाग व मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत पानेगांव येथील विकासकामांची पाहणी करताना समितीचे अधिकारी व ग्रामस्थ यांच्या श्रमदानातून लोकचळवळ निर्माण झाली. जलसमृद्ध, वृक्षारोपण आणि संवर्धन स्वच्छ व हरित गाव निर्मितीसोबतच सक्षम ग्रामपंचायत, उपजीविका विकास, सामाजिक न्याय आणि नावीन्यपूर्ण उपक्रम या घटकांचा सूक्ष्म अभ्यास करून ग्रामविकासाचा मजबूत पाया उभारण्यात आला. शासकीय इमारती बरोबरच वृक्षांना रंगरंगोटी, स्वच्छ माझे अंगण, समृद्ध माझे गाव, स्त्री जन्माचे स्वागत, यांसारख्या योजना पानेगांवात राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात तालुक्यातील जवळपास २२ गावांनी सहभाग नोंदवला. यात पानेगांव गाव अग्रेसर असून, १९९९ साली संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात सहभागी घेवून राज्यस्तरीय पुरस्कार मध्ये निवड झाली होती.त्याच पद्धतीने यावेळी हि ग्रामपंचायतीच्या विकासकामांच्या माध्यमातून आपल्या गावाला राज्य शासनाचे बक्षीस मिळवून देण्यासाठी गावातील ग्रामस्थ ग्रामपंचायत प्रशासनाला सर्वोतोपरी मदत करीत आहेत. पानेगांव बरोबरच तालुक्यातील सहभाग घेतलेल्या विकासकामांचीही अधिकाऱ्यांनी पाहणी केली. नाविन्यपूर्ण उपक्रमांचे अधिकाऱ्यांनी विशेष कौतुक करुन गावात असणारे जवळपास दोन हजार झाडांचे वृक्षारोपण आणि संवर्धन, मियावाकी झाडांचे यशस्वी संवर्धन, मंदिर जिर्णोद्धार वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी अद्यावत वाचनालय, गावातील सुसज्ज ग्रामपंचायत कार्यालय ग्रामसंसद सुसज्ज आकर्षक मोक्षधाम गावातील स्वच्छतेबरोबरचं, डिजिटल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डिजिटल अंगणवाड्या, भव्यदिव्य असलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा पानेगांवकरांचा एकोपा, आणि लोकसहभाग,व प्रशासनाचा दूरदृष्टिकोनातून तालुका स्तरावरील व ग्रामस्तरावरील अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन राजकिय विरहित वातावरण दाखवलेली एकजूट प्रेरणादायी ठरत आहे. यावेळी पानेगांव माजी लोकनियुक्त सरपंच संजय जंगले, विद्यमान लोकनियुक्त सरपंच सौ निकीता भोसले/आंबेकर उपसरपंच सुरेश जंगले ग्रामविकास अधिकारी गणेश पाखरे आदीं सह येथील पदाधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी,आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिक्षक वृंद, अंगणवाडी आशासेविका ग्रामस्थ उपस्थित होते.

> छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळ्याने ओळख निर्माण होत असलेल्या पानेगावात एकोप्याने १९९९ साली संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात सहभाग घेऊन राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्यापासून गावात विकासकामांना गती मिळाली असून डिजिटल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डिजिटल अंगणवाड्या बरोबरच गावातील मंदिर जिर्णो द्धार, वृक्षारोपण व संवर्धन, वाचनसंस्कृती, वाळू संवर्धन सुसज्ज ग्रामपंचायत कार्यालय हे सर्व पाहणी करण्यासाठी आसपासचे ग्रामस्थ पाहणी करण्यासाठी येत आसतात यावेळी हि नक्कीच मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात निवड होईल.
>
> **संजय जंगले**
> **माजी लोकनियुक्त**
> **सरपंच पानेगांव (ता नेवासे)**



पानेगांव (ता. नेवासे) मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान पाहणी करण्यासाठी आलेल्या टीमने छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुजन करण्यात आले यावेळी ग्रामस्थ तसेच मान्यवर उपस्थित होते (छाया- बाळासाहेब नवगिरे)

# इ.१० बोर्ड परीक्षेत कल्याणी येळवंडे श्री घोडेश्वरी विद्यालयात सर्व प्रथम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज शिक्षण संस्थेच्या श्री घोडेश्वरी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची इयत्ता दहावीच्या परीक्षेत कल्याणी काकासाहेब येळवंडे ही प्रथम आली असून तिला ९१.८० टक्के गुण प्राप्त झाले आहेत द्वितीय क्रमांक कार्तिक अनिल कोरडे याला ९१.६० टक्के गुण प्राप्त झाले आहेत तृतीय क्रमांक समृद्धी रामकिसन काळे हिचा आला असून तिला ८६.८० टक्के गुण प्राप्त झाले आहेत.

विद्यालयाचा इयत्ता १० वी चा निकाल हा ८२.७८ टक्के लागला असून यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी व विश्वस्त व सदस्य,शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी संघ, ग्रामस्थ याच बरोबर विद्यालयाचे प्राचार्य बाबासाहेब खेमनर, उपप्राचार्या एच.बी.लंके, पर्यवेक्षिका ए.एल .देशमुख याचबरोबर सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

# मुळा व्हॅली पब्लिक स्कूलचा दहावीचा शंभर टक्के निकाल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव** : प्रबोधन एज्युकेशन ॲण्ड रिसर्च फौंडेशन संचलित मुळा व्हॅली पब्लिक स्कूल, आग्रेवाडी या विद्यालयाने इयत्ता दहावीच्या परीक्षेत यंदाही उल्लेखनीय यश संपादन करत सलग आठव्या वर्षी १०० टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाच्या या नेत्रदीपक यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांवर, शिक्षकांवर व पालकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुणवत्तेची परंपरा कायम राखत यंदाच्या निकालातही घवघवीत यश मिळविले. यामध्ये १४ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविले असून १८ विद्यार्थ्यांनी ६० ते ७५ टक्के दरम्यान गुण प्राप्त केले आहेत. तसेच २ विद्यार्थ्यांनी ५५ ते ६० टक्के गुण मिळवत विद्यालयाच्या यशात मोलाची भर घातली.

विद्यालयातील तनुष्का भास्कर काळनर हिने ९१.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. अनुष्का सचिन काकडे हिने ८८.८० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. अनुज संभाजी माने याने ८८.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. अक्षदा साहेबराव डुकरे हिने ८७.४० टक्के गुणांसह चौथा क्रमांक मिळविला, तर स्नेहल सोपान जाधव हिने ८५ टक्के गुण मिळवत पाचवा क्रमांक संपादन केला.

# ज्ञानदान उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : गरजू आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणा साठी आमदार अमोल खताळ यांनी सुरू केलेल्या ज्ञानदान सामाजिक उपक्रमाला नागरिकांनी मागील वर्षा प्रमाणे याही वर्षी अभूतपूर्व प्रतिसाद दिला आहे.कोणताही विद्यार्थी केवळ आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये, हा उदात्त हेतू डोळ्या समोर ठेवून केलेल्या आव्हानाला प्रतिसाद देत कार्यकर्त्यांनी वह्या पेन, दप्तर, कंपास बॉक्स, पेन्सिल, पॅड रंग साहित्य इतर शालेय साहित्य भेट देत सामाजिक उपक्रमांनी जन्मदिवस साजरा करण्यात आला. जन्मदिवसानिमित्त शुभेच्छा देण्या साठी कोणीही हार गुच्छ भेटवस्तू देण्याऐवजी विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य देण्याचे आवाहन आमदार अमोल खताळ पाटील यांनी केले होते त्यांच्या आवाहनाला तालुक्या तील त्यांच्या चाहत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत शालेय साहित्य भेट देत सामाजिक बांधिलकी जपली राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांसह व्यापारी, शिक्षक, युवक मंडळे, स्वयंसेवी संस्था आणि सर्व सामान्य नागरिकांनी ही मोठ्या प्रमाणात साहित्य जमा केले आहे.या उपक्रमामुळे अनेक गरजू विद्यार्थ्यां च्या चेहऱ्यावर आनंद फुलणार असून आगामी शैक्षणिक वर्षात त्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. जमा झालेले सर्व साहित्य तालुक्यातील ग्रामीण भागातील तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांना पारदर्शक पद्धतीने वितरित करण्यात येणार असल्याची माहिती आमदार अमोल खताळ पाटील जनसंपर्क कार्यालया कडून देण्यात आली. दरम्यान, ज्ञानदान उपक्रमामुळे परिसरात सामाजिक जाणीव निर्माण झाली असून शिक्षणासाठी समाजाने एकत्र येण्याचा सकारात्मक संदेश या माध्यमातून दिला आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी समाजाने पुढाकार घेतल्यास अनेक कुटुंबांना आधार मिळू शकतो, अशी भावना नागरिकां मधून व्यक्त होत आहे. आमदार अमोल खताळ यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून अनेकांनी हा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे म्हटले आहे.

# तालुका शिवसेना पदाधिकाऱ्यांची मंत्री सामंत यांच्या उपस्थितीत आढावा बैठक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री तथा शिवसेना अहिल्यानगर जिल्हा संपर्क मंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली नेवासाफाटा येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यावेळी नेवासा तालुक्याचे आ. विठ्ठलराव लंघे यांनी प्रमुख उपस्थितीत सहभाग घेत शिवसेना पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.



झालेल्या आढावा बैठकीत संघटनात्मक बळकटी, बूथस्तरापर्यंत कार्यकर्त्यांचे जाळे अधिक सक्षम करण्याची दृष्टीने पुढील नियोजन,आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर रणनीती तसेच शासनाच्या विविध लोक कल्याणकारी योजनांचा लाभ मतदारसंघातील प्रत्येक नागरिकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

शिवसेना पक्ष बळकट करण्यासाठी पदाधिकारी, शिवसैनिक घेत असलेली मेहनत आणि कार्यतत्परता निश्चितच कौतुकास्पद असून शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथ शिंदे,ना.उदय सामंत,खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेची ताकद अधिक वृद्धिंगत करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

बैठक प्रसंगी शिर्डी लोकसभा मतदार संघातील शिवसेनेचे माजी खा. सदाशिव लोखंडे,नितीन औताडे,संजीव भोर, उद्योजक प्रभाकर शिंदे,नेवासा नगरपंचायतचे नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले,नेवासा विधानसभा प्रमुख भाऊसाहेब वाघ,संपर्क प्रमुख बाळासाहेब पवार,महिला आघाडी प्रमुख शोभाताई आलवणे यांच्यासह,शिवसेनेचे नगरसेवक व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# तक्रार निवारण दिनास उत्स्फूर्त प्रतिसाद; १ हजाराहून अधिक अर्ज निकाली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तक्रार निवारण दिनास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून तब्बल १ हजार २९ तक्रार अर्ज निकाली काढण्यात आले आहेत, अशी माहिती पुणे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी दिली. पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली ८ मे २०२६ रोजी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये तक्रार निवारण दिन आयोजित करण्यात आला होता. नागरिकांच्या प्रलंबित तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी ही विशेष मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमाद्वारे नागरिकांना थेट पोलीस अधिकाऱ्यांसमोर आपली बाजू मांडण्याची संधी मिळाली. तसेच अर्जदार व गैरअर्जदारांना समक्ष बोलावून प्रकरणांची सखोल चौकशी करण्यात आली. यामध्ये एकूण १०३६ अर्जदार उपस्थित राहिले. त्यापैकी ४२३ वरिष्ठ स्तरावरील अर्ज तर ६०६ स्थानिक स्तरावरील अर्ज निकाली काढण्यात आले. जिल्हा पोलीस प्रशासनाने राबविलेल्या या उपक्रमामुळे नागरिक व पोलीस यांच्यातील समन्वय अधिक दृढ झाल्याचे दिसून आले.

# खटोड कन्या विद्यालयाचा दहावीचा निकाल ८९.४० टक्के

## चैतन्या आहेर विद्यालयात प्रथम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : येथील हिंद सेवा मंडळाच्या भि. रा. खटोड कन्या विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल यंदा ८९.४० टक्के लागला असून कु. चैतन्या अमितराज आहेर हिने ९५ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थिनींमध्ये वृंदा श्रीगणेश देवळालकर हिने ९४.४० टक्के गुणांसह द्वितीय, तर भक्ती भगवान भाबड हिने ९४.२० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. भक्ती विजय शिवलकर हिने ९३.८० टक्के गुणांसह चौथा, तर ऋतुजा राकेश बनकर हिने ९२ टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक मिळविला. संस्कृत विषयात दुर्गा सोमनाथ बोराडे हिने शंभरपैकी शंभर गुण मिळवत विशेष यश संपादन केले. यंदा परीक्षेला विद्यालयातील एकूण २१९ विद्यार्थिनी बसल्या होत्या. त्यापैकी १९५ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून १८ विद्यार्थिनींनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळविले आहेत.

विद्यालयाच्या यशाबद्दल प्राचार्य डॉ. मंगला भोसले यांनी समाधान व्यक्त केले. हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी व स्कूल कमिटी चेअरमन दत्तात्रय साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांचा या यशात मोठा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले. यशस्वी विद्यार्थिनींचे संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद व पालकांनी अभिनंदन केले.

# मानोरी पोटनिवडणुकीतील विजयी सदस्यांचा माजी मंत्री तनपुरे यांच्या हस्ते सत्कार



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** :तालुक्यातील मानोरी येथे नुकत्याच पार पडलेल्या ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत विजयी ठरलेल्या सदस्यांचा माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या कार्यालयात सत्कार करण्यात आला. यावेळी विजयी सदस्य अक्षय राजेंद्र पोटे व संगीता नवनाथ थोरात यांना पुष्पगुच्छ व शाल देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी विजयी सदस्यांचे अभिनंदन करत ग्रामपंचायतीचा कारभार पारदर्शक व जनतेच्या हिताचा ठेवावा, असे आवाहन केले. गावाच्या विकासासाठी प्रामाणिकपणे काम करत नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध राहण्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

या प्रसंगी राहुरी पंचायत समितीचे माजी उपसभापती रवींद्र आढाव, संजय पवार, पिराखाँभाई पठाण, नवनाथ थोरात, वैभव पवार, रावसाहेब चुळभरे, अमोल थोरात, अमोल पोटे,सागर थोरत, सविता गुजाळे, मनीषा थोरात आदी मान्यवर उपस्थित होते.

# श्री संत ज्ञानेश्वर मंदिरातील बाल संस्कार शिबिरास १६० विद्यार्थ्यांचा सहभाग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तीर्थक्षेत्र नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात उन्हाळयाच्या सुट्टीनिमित्त संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने आयोजित केलेल्या पंधरा दिवशीय वारकरी बाल संस्कार शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून पहिल्याच दिवशी १६० विद्यार्थ्यांनी या शिबिरात सहभाग नोंदवला आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे मार्गदर्शक वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री हे या शिबिरातील मुलांना अमूल्य मार्गदर्शन करत आहेत. पहाटे ४ वाजेपासून शिबिराचा दिनक्रम सुरू होतो. यामध्ये सकाळी साडेपाच वाजता हनुमान चालीसा पठण कार्यक्रम पहाटे सहा वाजता आरती झाल्यानंतर संतसेवक आदिनाथ महाराज पांगरे व संतसेवक दामोदर पवार हे मुलांकडून योगासने करून घेतात.

या नंतर उपस्थित बाल वारकऱ्यांना अल्पोपहार दिला जातो व त्यानंतर संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त व मार्गदर्शक गुरुवर्य वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के शास्त्री हे बाल वारकऱ्यांचा गीता पाठ घेतात, गीता पाठ झाल्यानंतर मंदिरात उपस्थित असलेल्या महाराज मंडळींपैकी वेगवेगळ्या अभंग ओवी पाठ करून घेतल्या जातात. गहिनीनाथ महाराज आढाव हे देखील प्रशिक्षण देण्यासाठी वेळ देत आहे.

दुपारी बारा वाजता भोजन झाल्यानंतर मुलांकडून वेगवेगळे खेळ गप्पागोष्टी असे विरंगुळा प्राप्त करणारे कार्यक्रम घेतले जातात त्यानंतर दोन तास विश्रांती त्यानंतर संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त गायनाचार्य ज्ञानदेव माऊली शिंदे हे मुलांना मार्गदर्शन करून अभंग गायनाच्या संदर्भात मार्गदर्शन करतात त्यानंतर उपस्थित मृदुंगाचार्य महाराज मंडळीच्या मार्फत मृदंगाचे प्रशिक्षण दिले जाते.

त्यानंतर बाल वारकऱ्यांना विविध अभंगासह भजन शिकविले जाते आणि सायंकाळी ५ वाजता सामुदायिक हरिपाठ घेतला जातो. सायंकाळी ७ वाजता शिबिरातील सर्व बालवारकऱ्यांना सायंकाळचे भोजन दिले जाते. सकाळी श्रीमद भगवत गीतेची तसेच रात्री वेगवेगळ्या स्तोत्रांची संथा गुरुवर्य देविदास महाराज म्हस्के हे देत आहे.

वरील वेळापत्रकानुसार नि:शुल्क असलेल्या बाल संस्कार शिबिरात बाल वारकऱ्यांना वारकरी संप्रदायातील मृदुंग वादन, हार्मो नियम वादन, गायन आदी प्रशिक्षण दिले जाते.



# सुदर्शन इंग्लिश स्कूलचा ९०.६० टक्के निकाल







**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील पिचडगाव येथील सुदर्शन इंग्लिश स्कूलचा इयत्ता दहावीचा निकाल ९०.६० टक्के इतका लागला आहे.कोणतीही शिकवणी न लावता येथील विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी घेतलेल्या जादा तासीकेच्या जोरावर यश संपादन केले असल्याने पालक वर्गातून शिक्षकांचे कौतुक होत आहे.विशेष म्हणजे येथील मुलींनी प्रथम,द्वितीय,तृतीय क्रमांक पटकावून बाजी मारली आहे.

इयत्ता दहावीच्या परीक्षेत कु.तेजस्विनी लाजरस साळवे ७६ टक्के गुण मिळवून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे.कु.साक्षी संतोष शिंदे हिने ७३.६० टक्के गुण मिळवून द्वितीय तर कु.पल्लवी नवनाथ हजारे या विद्यार्थिनीने ७१ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष रामदास गोल्हार, डॉ.अशोक साळवे टिटवाळा कल्याण, शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय कोळेकर,माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीप सरोदे,नेवासा प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष पत्रकार सुधीर चव्हाण यांच्यासह सर्व शिक्षकांसह विद्यार्थी पालकांनी यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmailD- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी कृती आराखडा तयार करा

## वीजपुरवठा शेतकरी हिताचा करण्यासाठी; मंत्री विखेंचे महावितरणला निर्देश



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : वीजपुरवठा खंडित होण्याच्या वाढत्या तक्रारी, कृषी पंपांना रात्रीच्या वेळेस मिळणारी वीज आणि भारनियमनाच्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी तातडीने कृती आराखडा तयार करावा, असे स्पष्ट निर्देश जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिले. उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यातील महावितरणच्या विविध समस्या, वीजपुरवठा स्थिती आणि उपाययोजनांबाबत लोणी येथे विशेष आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीत पालकमंत्री विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांकडून वीज भारनियमन, वारंवार खंडित होणारा पुरवठा, ग्रामीण भागातील तक्रारी तसेच स्थानिक अडचणींबाबत सविस्तर माहिती घेतली. ते म्हणाले की, राज्य भारनियमनमुक्त करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकार सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. स्थानिक पातळीवर नियोजनबद्ध काम करून संध्याकाळच्या भारनियमनात कपात करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात. ग्रामीण व कृषी भागातील ग्राहकांना प्राधान्याने दर्जेदार वीजपुरवठा देण्याची जबाबदारी महावितरणने पार पाडावी.

पालकमंत्री विखे पाटील यांनी कृषी पंपधारकांसाठी सौर ऊर्जेचा वापर वाढविण्यावर विशेष भर दिला. त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना सौर पंप योजनांविषयी प्रोत्साहन देऊन व्यापक जनजागृती करणे गरजेचे आहे. सौर योजनेत कोणत्याही प्रकारची फसवणूक होऊ नये, यासाठी अधिकाऱ्यांनी योग्य मार्गदर्शन करावे.

ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठा योजनांसाठी सौर पंपांचा वापर वाढविण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासन व महावितरणने संयुक्त प्रयत्न करावेत. जिल्हा परिषद व नगरपालिकांच्या पाझर तलावांवरही सौर पंप उभारणीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. पावसाळ्यापूर्वी वीज यंत्रणा सक्षम करण्यासाठी वाकलेले पोल, मोडलेले खांब, झाडांच्या फांद्यांमुळे अडथळा निर्माण करणाऱ्या तारा यांची तातडीने दुरुस्ती करावी, असे आदेशही त्यांनी दिले. वादळ, पाऊस व नैसर्गिक आपत्तीच्या काळात वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी पूर्वतयारी करण्यावर त्यांनी भर दिला. महावितरणच्या विविध योजना, नियोजित वीजपुरवठा बंदची माहिती आणि सेवा समाजमाध्यमांतून नागरिकांपर्यंत तत्काळ पोहोचवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारावी.

शेतकऱ्यांना वेठीस न धरता त्यांच्या हितासाठी काम करा, असा स्पष्ट सल्लाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिला. बैठकीस कार्यकारी अभियंता पी. आर. वटमवार, उपकार्यकारी अभियंता डी. डी. पाटील, सहाय्यक अभियंते के. एस. खरगे, के. एन. दंडवते, डी. एस. मुळे, रोहित तायडे, पी. डी. परदेशी यांच्यासह विविध उपविभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# दखल


## सेंट झेवियर्स ज्युनियर कॉलेजचे बारावी परीक्षेत यश

**श्रीरामपूर** : येथील सेंट झेवियर्स स्कूल व ज्युनियर कॉलेजने एस.एस.सी. व एच.एस.सी. बोर्ड परीक्षा २०२६ मध्ये घवघवीत यश संपादन करत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली. विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश मिळवत संस्थेचा नावलौकिक वाढविला आहे.

एस.एस.सी. परीक्षेत साइश गलांडे ९५.६० टक्के गुणांसह प्रथम आला. मेहक बलानी ९२.४०, निधी धुस्सा ९१.१०, सार्थक माने ९०, इस्मा जहागीरदार ८९.६०, आकाश देंगळे ८९.४० व स्नेहा बिंद्रा ८९.२० टक्के गुणांनी यशस्वी झाले. एच.एस.सी. परीक्षेत आर्यन अमोल शिंदे ७८.३३ टक्के गुणांसह प्रथम आला. सानिका दोईफोडे ७३.५०, आरोही शेडगे ७३.१७, प्राज्वल बनसोडे ७१.५०, एंजल सिंधवानी ७१.१७, प्राजित कदम ६९.६७ व तमनप्रीत कौर कथुरिया ६८.५० टक्के गुणांनी यश मिळविले.

शाळेचे व्यवस्थापक रेव्ह. फा. रॉबर्ट यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्राचार्या मीनाक्षी यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या.

## दहावीच्या परीक्षेत रामराव आदिक पब्लिक स्कूलची उज्ज्वल कामगिरी



**श्रीरामपूर** : गुणवत्तापूर्ण शिक्षणाची उज्ज्वल परंपरा जपत रामराव आदिक पब्लिक स्कूलने दहावीच्या परीक्षेत यंदाही निकालाची उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे.

यंदाच्या परीक्षेत स्नेहा गुंड हिने ९१.६० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. साई पाटील याने ८६.२० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर शिफा शेख हीने ८५.८० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक संपादन केला. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांना विजय शेळके, दिलीप वैराळ, रेणुका लांडे, अर्चना सातदिवे, प्रतिभा आढाव, स्नेहल गवळी, हर्षदा रणच्छोड , फिजा पटेल, गीतांजली ताके या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

## श्रीरामपूरच्या आठवडे बाजारातून मोबाईल चोरीचे सत्र

**श्रीरामपूर** : मागील काही दिवसांपासून शहरातील काही भागातून व आठवडे बाजारात भरदिवसा भुरट्या चोरट्यांचा धुमाकुळ घातला असून पोलीस प्रशासनाने चोरट्याचा त्वरित बंदोबस्त करावा,अशी मागणी सर्वसामान्य नागरिकामधून होत आहेत. गेल्या तीन आठवड्यातून बाजारतळ येथून चार ते पाच मोबाईल चोरीला गेल्याची घटना घडलेल्या नागरिकांनी प्रशासनाबाबत तीव्र संताप व्यक्त केला. प्रशासनाकडे नागरिकांनी केली तक्रार यांची कोणतेही दखल घेतली जात नाही.

या प्रकरणाकडे प्रशासन कधी लक्ष घालणार प्रश्न असा उपस्थित केला. विशेष म्हणजे शुक्रवारी (दि.८) मे रोजी एका दिवसातच आठवडे बाजारातून पाच मोबाईल चोरीला गेल्याचे माहिती समोर आलयं.त्यामुळं बाजारतळ परिसरातून फिरणं मुश्किल झाल्याचे दिसत आहेत.तेथे कायमच चोऱ्या होत आहे.अश्यानेच आणखी चोरट्याचे मनोबल वाढल्याचे दिसून आले. सध्या मोबाईल चोरीच्या घटनांमध्ये मात्र वाढ झाली.

बाजारातून घुसून मोबाईल लांबविण्याचे प्रकार जास्त प्रमाणात आहे.गेल्या काही दिवसापासून चोरीचे गुन्हे वाढले असले तरी,सायबरविषयक गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे.त्यातही मोबाईल चोरीचे प्रमाण खूपच वाढले आहे.गर्दीच्या ठिकाणी तर,खिशात ठेवलेला मोबाईल अलगदपणे लांबवला जातो.असे चित्र पहावयास मिळते.

## शिवचिदंबर माध्यमिक विद्यालयाची यशाची परंपरा कायम

**सोनई** : नेवासा तालुक्यातील गणेशवाडी येथील राजर्षी प्रतिष्ठान संचलित शिवचिदंबर माध्यमिक विद्यालयाने एसएससी मार्च २०२६ परीक्षेत ९५.५५ टक्के निकाल नोंदवत यशाची परंपरा कायम राखली. विद्यालयाच्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

यंदा परीक्षेसाठी ४५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. सर्व विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले असून त्यापैकी ४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यालयातील मुलींनी गुणवत्तेत विशेष चमक दाखविली. श्रुती विठ्ठल दरंदले हिने ९२ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. अंकिता अण्णासाहेब बेल्हेकर हिने ९१ टक्के गुणांसह द्वितीय, तर अनुष्का पांडुरंग मडके हिने ८७.४० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

आरती रामेश्वर तांदळे हिला ८४ टक्के, तर भक्ती दिगंबर लोहकरे हिला ८३.६० टक्के गुण मिळाले. विद्यालयातील १६ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, २३ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, तर ५ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणीत यश मिळविले.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव दत्तात्रय लोहकरे पाटील व मुख्याध्यापक राजेंद्र लोहकरे यांनी विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे अभिनंदन केले.

# नेवाशाच्या औद्योगिक विकासाला गती : मंत्री उदय सामंत



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : ऐतिहासिक व धार्मिक वारसा लाभलेल्या नेवासा शहरात दोन ते तीन मोठे उद्योग मंजूर करावेत या नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांच्या मागणीला राज्य सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी या मागणीची दखल घेत मंत्रालयात तातडीने विशेष बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिले आहे.

नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांनी निवेदनाद्वारे नेवासा तालुक्याची सद्यस्थिती मांडली. तालुका कृषीप्रधान असून येथे मुबलक पाणी व जमीन उपलब्ध आहे. मात्र, सध्याची एमआयडीसी शहरापासून ४० कि. मी. अंतरावर पांढरीपुल येथे असल्याने स्थानिकांना रोजगाराचा लाभ मिळत नाही. नेवासा शहराचया लगतच उद्योग उभारल्यास युवकांच्या हाताला काम मिळेल आणि शहराच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती येईल, असा आग्रही मुद्दा डॉ. घुले यांनी मांडला.

संत ज्ञानेश्वर महाराज, सर्वज्ञ चक्रधर स्वामी, आदिशक्ती म्हाळसा माता आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पदस्पशनि पावन झालेले हे शहर औद्योगिक केंद्र म्हणून ही विकसित व्हावे अशी भूमिका डॉ. घुले यांनी मांडली. केवळ तीर्थक्षेत्रावर विसंबून न राहता औद्योगिक क्रांती झाल्यास नेवाशाचा चेहरामोहरा बदलेल असे त्यांनी सांगितले.

यावर ना. सामंत यांनी प्रतिसाद देत नेवाशाच्या औद्योगिक प्रश्नावर मंत्रालयात स्वतंत्र बैठक घेण्याचे निर्देश दिले आहेत. नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांच्या या पाठपुराव्याचे सर्व स्तरातून स्वागत होत असून, सुशिक्षित बेरोजगारांमध्ये आशेचे वातावरण आहे.

# जलसंपदा विभागाने वीज पुरवठा पूर्ववत सुरु ठेवा : प्राजक्त तनपुरे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : आगामी काळात जलसंपदा विभागाला पाण्याचे संकट जाणवणार असल्याच्या कारणाने सध्याच्या उपलब्ध पाणी साठ्यावर पुढील पाण्याचे नियोजन करण्याची वेळ आल्याने पाणी बचतीसाठी विविध उपाय योजना जलसंपदा विभागाने हाती घेतल्या आहेत . राहुरी तालुक्यात योजनेनुसार मुळा जलाशयात वीज रोहित्रे बंद करण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे. पाण्याअभावी शेती व्यवसाय कसा करावा असा प्रश्न उभा ठाकल्याने चिंतेचे सावट पसरले आहे.

या संदर्भात जलसंपदा विभागाला माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी लक्ष वेधत शेतकऱ्यांच्या मागणीनुसार वीज पुरवठा पूर्ववत सुरूच ठेवण्याचे निवेदन सादर केले.डॉ. बाबुराव तनपुरे सहकारी साखर कारखान्याचे संचालक किसनराव जवरे , प्रगतशील शेतकरी बाबासाहेब सोनवणे यांच्यासह तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्याकडे मागणी केली होती.या निवेदनात म्हटले की, राहुरी तालुक्यात असलेल्या मुळा धरणातील चिंचाळे, कुरणवाडी, गडदे आखाडा , मल्हारवाडी , जांभळी , जांभूळबन, वावरथ, घोरपडवाडी, बाभुळगाव, खडांबे येथील शेतकऱ्यांनी मुळा धरणाच्या पाण्यावरून पाईपलाईन नेऊन शेतीसाठी पाणी उचलले आहे . या ठिकाणी सुमारे २२० रोहित्रे आहेत. सुमारे एक हजार पाचशे शेतकरी याद्वारे शेतीसाठी पाणी उचलतात परंतु मुळा धरणातील उपलब्ध पाण्याचे नियोजना खाली पाणी राखीव ठेवण्याची भूमिका जलसंपदा विभागाने भूमिका अंगीकारली आहे.

त्यातून वीज पुरवठा खंडित केला आहे. सध्या कडाक्याचा उन्हाळा असल्याने शेतातील उभ्या पिकांना पाण्याची नितांत गरज आहे. खंडित वीज पुरवठ्यामुळे पिके जळण्याच्या स्थितीत आल्याने शेतकरी चिंतातुर बनले आहेत. जलसंपदा विभागाने वीजपुरवठा खंडित न करता पावसाळा येईपर्यंत धरणातील पाणी उचलण्यास आडकाठी करू नये अशी मागणी संबंधित लाभधारक गावातील शेतकऱ्यांनी केली आहे.

# शिवाजीराव कपाळे यांना आनंदवन सेवाभावी संस्थेचा पसायदान पुरस्कार जाहीर



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील पसायदान आनंदवन सेवाभावी संस्था यांच्या वर्धापनदिनानिमित्त दिला जाणारा प्रतिष्ठेचा समजला जाणारा 'पसायदान' पुरस्कार यंदा राहुरी येथील साई आदर्श मल्टिस्टेटचे चेअरमन शिवाजीराव कपाळे यांना जाहीर करण्यात आला आहे. याशिवाय पंढरीनाथ महाराज वारकरी संस्था चे पंढरीनाथ महाराज तांदळे तसेच आरोग्य क्षेत्रात जागतिक स्तरावर कार्य करणारे डॉ. संजय सोनवणे यांनाही 'पसायदान' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

दरम्यान, जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष स्व. सोपानराव दरंदले यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुरू करण्यात आलेला 'पत्रकार रत्न पुरस्कार' पत्रकार सूर्यकांत नेटके यांना प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे सचिव संजय गर्जे व गोविंद महाराज निमसे यांनी दिली. संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त मंगळवार, १२ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता ध्यानमंदिर प्रांगणात पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात नेवासा येथील सदुरु नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत उद्धव महाराज मंडलिक तसेच शनैश्वर देवस्थान ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

# मुठेवाडगांव ग्रामपंचायतची समृद्ध पंचायत अभियानांतर्गत पाहणी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगांव** : श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवाडगांव ग्रामपंचायत विविध विकास कामांची मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान अंतर्गत पाटोदा ( जिल्हा बीड) येथील टीम ने भेट देऊन संपूर्ण विकास कामाची पाहणी केली. मुठेवाडगांव ग्रामपंचायतला आतापर्यंत विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

आदर्श गांव योजनेच्या शासनाच्या नकाशावर आलेले असल्याने.आतापर्यंत केंद्र व राज्य सरकारच्या विविध पथकाने पाहणी केलेलीं आहे. पाटोदा जिल्हा बीड येथील गटविकास अधिकारी उध्दव सानप यांच्या मार्गदर्शनाखाली पाहणी पथकाने गावातील स्वछता,स्वच्छ पाणी पुरवठा,सांडपाणी वेवस्था,वृक्ष लागवड झाडांना पाणी देण्यासाठी ठिबक सिंचन,सौर ऊर्जेचा वापर,गावातील महिला बचत गट उदयोग वेवसाय,सार्वजनिक समशान भूमी,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, श्री संत तुळशीराम महाराज देवस्थान,विकास कामे,दलित वस्ती विकास कामे,आदी,सर्वजणी ओढ्यावर तयार केले बंधारे,आदी विविध विकास कामाची पाहणी केली. सर्व टीमचे ग्रामपंचयत कार्यालयात सरपंच सागर मुठे यांनी स्वागत केले.

अभियान काळात केलेल्या विविध कामाची माहिती पथकास देण्यात आली.मुठेवडगाव गावाला अभिमान कला मध्ये केलेल्या कामाच्या आधारे,मुख्यमंत्री समृद्ध पंचायत मध्ये तालुक्यातील एक नंबर चे बक्षीस मिळावे अशी मागणी उपस्थित ग्रामस्थांनी केली,नंतर सर्व टीम सदस्यांना पुस्तके भेट देण्यात आली, यावेळी ग्रामविकास अधिकारी सुधीर उंडे,नितीन बोरुडे,चंद्रकांत खरे,गोकुळ मुठे,माजी सरपंच जालिंदर मुठे,महिला बचत गटाच्या महिला प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक,अंगणवाडी सेविका आशा सेविका,आरोग्य अधीकारी डॉ प्रिती सैदोरे संगणक क्लर्क कासम सय्यद, कर्मचारी शाम मुठे,भारत कडूस आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

पाटोदा गटविकास अधिकारी उद्धव सानप यांच्या मार्गदर्शनाखालील टिमध्ये बापुराव राख वि.अ.(ग्रा.पं.), उद्धव नेटके वि.अ.(कृषि), संतोष खटाणे (उपअभियंता), अरशद शेख (क.सहायक) श्रीरामपूर पंचायत समितीचे संपर्क अधिकारी अशोक खेडकर, पावसे यांचा समावेश होता.

# नाकोडा स्वीट मिठाईचे दुकान शॉर्टसर्किटने जळून खाक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात असलेले नाकोडा स्वीट मिठाईचे दुकान पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास जळून खाक झाले आहे. यासंदर्भात समजलेली माहिती अशी की, राहुरी शहरातील छत्रपती शिवाजी चौक येथे बऱ्याच वर्षापासून असलेले नाकोडा स्वीट हे मिठाईचे दुकान पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास विजेच्या शॉर्ट सर्किट मुळे जळून खाक झाले आहे.

पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास दुकानातून धूर निघू लागला व वायर जळाल्याचा वास आल्यामुळे शेजारील व्यापारी जोशी यांनी बाहेर येऊन बघितले असता नाकोडा स्वीट मधून बाहेर धूर येत होता. त्यांनी तातडीने दुकानाचे मालक गजेंद्र सिंग राजपुरोहित यांना फोन लावून






झालेल्या घटनेची खबर कळविली. मालक राजपुरोहित आल्यानंतर त्यांनी दुकान उघडले त्यावेळी आगी मध्ये सर्व काही भस्मसात झाले होते त्यामध्ये दुकान चे फर्निचर दोन डीप फ्रीज गल्ल्यात असलेली काही रोकड व दुकानातील सर्व माल जागेवर जळून भस्म सात झाला होता यामध्ये साधारण मिठाईच्या दुकानाचे सुमारे १४ ते १५ लाखाचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

त्यानंतर राहुरी नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष गजानन सातभाई यांना फोन लावून ही खबर दिली असता सातभाई यांनी तातडीने राहुरी नगर परिषदेची अग्निशामक दलाची गाडी बोलावली तोपर्यंत आगीने रौद्ररूप धारण केले होते. व त्यामध्ये सर्व काही जळून खाक झाले होते. घटनास्थळी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी येऊन पाहणी केली आहे. दरम्यान आगीची घटना समजताच आजूबाजूच्या व्यापाऱ्यांनी व नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. यावेळी दुकानाचे मालक गजेंद्रसिंग राजपूरोहीत यांनी उपनगराध्यक्ष गजानन सातभाई व महावितरणच्या अधिकाऱ्यांना संपूर्ण माहिती दिली आहे.

नगरसेवक अमोल काशीद यांनीही घटनास्थळी भेट देऊन राजपुरोहित यांना धीर दिला. मात्र या व्यापाऱ्याचे आगीमध्ये सर्व काही जळून भस्मसात झाल्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत असून या व्यापाऱ्याचे अतोनात नुकसान झालेले असून त्यांना शासनाने नुकसान भरपाई देण्यासाठी योग्य ती पाऊले उचलावीत अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

छाया राजेंद्र परदेशी

# महाराणा प्रताप यांची जयंती उत्साहात साजरी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : नेवासा फाटा येथील शिव महाराणा प्रताप चौकात महाराणा प्रताप यांची जयंती प्रिन्स दरबार मित्र मंडळाच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी महाराणा प्रताप यांच्या मूर्तीचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास युवक व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. याप्रसंगी जनसेवक गणेश चौगुले यांनी महाराणा प्रताप यांचे विचार मांडून घोषणा देऊन एक आक्रमक भूमिका मांडत महाराणा प्रताप यांच्या विचारांचा जागर केला तसेच पोलीस पाटील आदेश साठे यांनी महाराणा प्रताप यांच्या शौर्य स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेच्या विचारांवर भाष्य करत युवकांनी त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

नगरसेवक कृष्णा परदेशी यांनी महाराणा प्रताप हे संघर्ष आणि स्वाभिमानाचे प्रतीक असल्याचे सांगत समाज एकजुटीची गरज व्यक्त केली. शिवसेना नेते गणेश झगरे यांनीही आपले विचार मांडताना युवकांनी इतिहासाचे भान ठेवून सामाजिक कार्यात पुढे यावे असे आवाहन केले. यावेळी प्रिन्स दरबार मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष बादल परदेशी यांनी महाराणा प्रताप यांच्या कार्याची माहिती देत त्यांचे प्रेरणा घेण्याचा संदेश दिला. यावेळी बादल परदेशी यांची जागतिक मानवाधिकार संघटनेच्या नेवासा तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

## पान १ वरुन

## श्रीरामपूरात केमिकलयुक्त दुधाचा पुरवठा !

तालुक्यातील काही दूध संकलन केंद्रांवरही दुधात भेसळ होत असल्याच्या तक्रारी यापूर्वी समोर आल्या आहेत. दूध उत्पादन वाढवण्यासाठी काही जण रासायनिक पदार्थ, पाणी व इतर अशुद्ध घटक मिसळत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे प्रामाणिक दूध उत्पादक शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान होत आहे. दूध भेसळ थांबवण्यासाठी प्रशासनाने कठोर कारवाई करावी, दोषींवर गुन्हे दाखल करावेत तसेच नियमित तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. शुद्ध दूध उपलब्ध झाल्यास शेतकऱ्यांच्या दुधाला योग्य दर मिळू शकतो, असे मतही व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, संबंधित प्रकरणाची अन्न व औषध प्रशासन तसेच स्थानिक प्रशासनाने तातडीने दखल घेऊन नमुने तपासणीसाठी पाठवावेत आणि सत्यता समोर आणावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## विकास लवांडे यांना काळे फासले!

यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले. तसेच, ट्विट करुन देखील त्यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. रोहित पवार म्हणाले की, राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर संग्राम भंडारे आणि त्याच्या गुंडांनी केलेला हल्ला आणि शाईफेकीसंदर्भात गुन्हा दाखल करण्यासाठी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात पोलिसांची भेट घेतली. लवांडे यांना पिस्तुलाचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली तरीही दबावाखाली असलेल्या पोलीस प्रशासनाने यासंदर्भातील आर्म अॅक्ट नुसार गंभीर गुन्हा दाखल करण्यास नकार दिला. यावरुन पोलिसांवर किती दबाव आहे हेच दिसून येतं. असं असेल तर या गुन्ह्याचा तपास खरंच पारदर्शक पद्धतीने होईल का आणि भर दिवसा कायद्याला न जुमानता मस्ती करणाऱ्या गुंडांविरोधात कारवाई होईल का, याविषयी आमच्या मनात शंका आहे. पण या गुन्ह्याच्या तपासाकडं आमचं लक्ष राहिल, असे म्हणत रोहित पवार यांनी याप्रकरणात आपली भूमिका स्पष्ट केली.

## विनेश फोगाटवर भारतीय कुस्ती महासंघाची बंदी

माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांच्यावर पुन्हा एकदा गंभीर आरोप केले. सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करत विनेश म्हणाली, उत्तर प्रदेशातील गोंडा येथे १० ते १२ मे दरम्यान सिनियर ओपन रँकिंग कुस्ती स्पर्धा आयोजित केली जात आहे.

आज, काही अडचणींमुळे मला हे सांगायचे आहे की, बृजभूषण शरण यांच्या विरोधात तक्रार दाखल केलेल्या सहा पीडितांपैकी मी एक आहे. माझी साक्ष न्यायालयात सुरू आहे. त्यांच्या घरी (गोंडा) जाऊन स्पर्धेत भाग घेणे माझ्यासाठी अवघड होईल. मला नाही वाटत की मी माझे १०० टक्के देऊ शकेन. एका मुलीसाठी हे खूप कठीण असेल. मी आणि माझी टीम स्पर्धेत भाग घेऊ. काही चुकीचे घडल्यास, भारत सरकार जबाबदार असेल. सुमारे तीन वर्षांपूर्वी विनेशने बृजभूषण यांच्यावर महिला खेळाडूंचा लैंगिक छळ केल्याचा आरोप केला होता. दिल्लीतील जंतर मंतर येथे महिला कुस्तीपटूंनी बृजभूषण यांच्या विरोधात आंदोलनही केले. विनेश या हरियाणातील जुलाना येथील कॉँग्रेसच्या आमदार आहेत. बृजभूषण हे भाजपचे माजी खासदार आहेत. सध्या, त्यांचा एक मुलगा खासदार आहे आणि दुसरा उत्तर प्रदेशमधून आमदार आहे.

## निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचा वर्धापन दिन ५ जून रोजी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचा वर्धापन दिन ५ जून रोजी साजरा होत असून त्यानिमित्त श्रीक्षेत्र माहूर येथे पत्रकार व विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. राज्यभरातील पत्रकारांना या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांच्या संकल्पनेतून शहर व ग्रामीण भागातील पत्रकारांना एक व्यासपीठ मिळावे, त्यांच्या पाठीशी संघटितपणे उभे राहता यावे आणि न्याय हक्कासाठी लढणाऱ्या पत्रकारांना बळ द्यावे या उद्देशाने संघटनेची स्थापना करण्यात आली. या सोहळ्यात उत्कृष्ट पत्रकारिता करणाऱ्या शहरी व ग्रामीण पत्रकारांसह सामाजिक, क्रीडा, शैक्षणिक, कृषी, आरोग्य, उद्योग, अध्यात्म, कायदेविषयक व इतर क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे.

पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून तो तळागाळातील प्रश्नांना वाचा फोडतो. मात्र त्याला अपेक्षित संरक्षण व सन्मान मिळत नाही. त्यामुळे या संघटनेची उभारणी करण्यात आल्याचे गणेश कचकलवार यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील पत्रकार, पदाधिकारी व सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दहशत निर्माण करणाऱ्या टोळीला पोलीस सोडणार नाहीत : ना.विखे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**आश्वी,** मागील काही दिवसांपासून आश्वी परिसरात चोरांनी निर्माण केलेली दहशत , चोरीच्या घटनांची वाढती संख्या ड्रोनच्या माध्यमातून समाजिक वातावरण भयग्रस्त करण्याच्या प्रयत्नाना असलेल्या दहशतीला आळा घालण्यासाठी पोलीस यंत्रणा आणि ग्रामस्थांनी एकत्रितपणे काम करावे,पोलीस प्रशासनाला सर्वतोपरी सूचना देण्यात आल्या आहेत. सरकार ग्रामस्थांच्या बरोबर आहे. गावातील भीतीचे वातावरण दूर करा. युवकाचे ग्रामसुरक्षा दल आणि लोकसहभागातून संघटीत गुन्हेगारीचा बंदोबस्त करण्यात यश येईल असा विश्वास जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला. आश्वी बुद्रुक व आश्वी खुर्द येथे अलीकडे घडलेल्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर परिसरातील विविध गावामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.या पार्श्वभूमीवर मंत्री विखे पाटील यांनी गावात येवून प्रमुख कार्यकर्ते ग्रामस्थ यांच्याशी संवाद साधून दिलासा दिला. बैठकीला संगमनेरचे पोलिस उपअधीक्षक कुणाल सोनवणे, स्थानिक गुन्हे शाखेचे किरणकुमार कबाडी, मांची हिल उद्योग समूहाचे संस्थापक शालिग्राम होळकर, मच्छिंद्र पाटील थेटे, रामभाऊ पाटील भुसाळ, कैलास नाना तांबे, बन्सी तांबे, भाऊ पाटील गायकवाड, मकरंद गुणे, बापूसाहेब गायकवाड, रोहिणीताई निघुते, अनिल भोसले आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांनी गावातील मुख्य चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, रात्रीचे भारनियमन बंद करणे तसेच पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी अशा मागण्या मांडल्या. त्यावर बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, पोलीस यंत्रणेची स्वतंत्र बैठक घेऊन या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. अफवांवर विश्वास न ठेवता युवकांनी ग्रामसुरक्षा दल स्थापन करून रात्री आठ नंतर गावात येणाऱ्या वाहनांची चौकशी करावी तसेच गावात नव्याने आलेल्या परप्रांतीय रहिवाशांची माहिती पोलीस प्रशासनाला द्यावी. सोशल मीडियाच्या माध्यमातून अफवा पसरू नयेत यासाठीही नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रवरा उजवा व डावा कालवा परिसरात दुपारच्या आणि रात्रीच्या वेळी आढळणाऱ्या संशयित व्यक्तींवर लक्ष ठेवण्यासाठी जलसंपदा विभाग व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने स्वतंत्र पथक स्थापन करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. परिसरातील अवैध धंदे आणि वाळू उपशावरही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा मंत्री विखे पाटील यांनी दिला.गाव सुरक्षित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनासोबत ग्रामस्थांनीही पुढाकार घेणे गरजेचे आहे. ग्रामसुरक्षा दल आणि संदेश प्रणालीच्या माध्यमातून गावांमध्ये सतर्कता वाढवावी, असे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले.

## गणेशखिंड येथील कृषी संशोधन केंद्र रोपवाटीकेस दोन तारांकन दर्जा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत गणेशखिंड, पुणे येथे असलेल्या विभागीय कृषि संशोधन केंद्राच्या रोपवाटीकेस भारत सरकारच्या राष्ट्रीय बागवानी बोर्डामार्फत दोन तारांकन दर्जा देऊन प्रमाणित करण्यात आले आहे. सदरच्या दोन तारांकन दर्जाची मान्यता ही २०२६-२७ व २०२७-२८ या दोन वर्षासाठी असणार आहे. गणेशखिंड संशोधन केंद्राच्या रोपवाटीकेस राष्ट्रीय बागवानी बोर्डाच्या समितीने प्रत्यक्ष भेट देऊन रोपवाटिकेत असलेल्या विविध फळझाडांचे मातृवृक्ष प्लॉट, शेडनेट हाउस, पॉलिहाउस, पाणी देण्याच्या सुविधा, कलमे व रोपांची प्रत्यक्ष पाहणी करून दोन तारांकन दर्जाची मान्यता दिलेली आहे.



रोपवाटिकेत असलेले मातृवृक्ष, मुलभूत सुविधा व कलमे रोपे यांची प्रत्यक्ष पाहणी करून राष्ट्रीय बागवानी बोर्डाच्या प्रमाणित करणार्या समितीने समाधान व्यक्त केले. गणेशखिंड येथील रोपवाटिकेत फळझाडामध्ये विशेष करून आंबा, पेरू, सीताफळ, डाळिंब, लिंबू व चिकू इ.फळझाडांची कलमे मोठ्या प्रमाणावर तयार करून शेतकर्यांना नियमितपणे पुरवठा केला जात आहे.

सध्या चालू हंगामामध्ये वरील फळझाडांची कलमे मोठ्या प्रमाणात विक्रीस उपलब्ध आहेत. रोपवाटीकेस दोन तारांकन दर्जाची मानांकन मिळाल्यामुळे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता (कृषी) डॉ. साताप्पा खरबडे व उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. भरत पाटील यांनी विभागीय संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. सुभाष भालेकर, रोपवाटिका प्रमुख व आदर्श रोपवाटिका प्रकल्पाचे मुख्य समन्वयक डॉ. बी. व्ही. गोंधळी व रोपवाटीकेतील इतर अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

## निधन वार्ता

### कमल कोळपकर



**राहुरी :** येथील कासार समाजातील जेष्ठ महिला सामाजिक कार्यकर्त्या कमल विश्वनाथ कोळपकर (वय ९०) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्याच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे शिवाजी चौकातील भांड्याचे व्यापारी संजय कोळपकर ,सुनिल कोळपकर, सुहास कोळपकर यांच्या त्या मातोश्री होत.

### सोपान कु-हे



**नेवासा :** तालुक्यातील खरवंडी येथील रहिवासी सोपान गेणू कु-हे यांचे (वय ७४) अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी,भाऊ रावसाहेब कुऱ्हे,बहिणी शकुंतला वांढेकर व नेहाबाई दळवी, मुली उज्वला शिंदे व संगीता गागरे आणि नातू गणेश व भारत कुऱ्हे असा मोठा परिवार आहे. पत्रकार नाथाभाऊ शिंदे यांचे ते सासरे होत.

### भामबाई भागवत



**श्रीरामपूर** - राहाता तालुक्यातील रुई येथील श्रीमती भामबाई बाबुराव भागवत (वय ९६ वर्ष) यांचे नुकतेच दुःखद निधन झाले.

त्यांचे पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या धार्मिक कार्यात नेहमी अग्रेसर असत. अशोक साखर कारखान्याचे कार्यालय अधिक्षक विक्रांत भागवत, अभियंता श्रीकांत भागवत, मंगेश भागवत यांच्या त्या आजी तर रुई गावातील प्रगतशील शेतकरी बाळासाहेब भागवत व राजेंद्र भागवत यांच्या त्या मातोश्री होत.

## ज्ञानेश्वर कारखान्याचे सेवानिवृत्त अधिकारी विलास काकडे यांचे निधन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** लोकनेते स्व.मारुतरावजी घुले पाटील श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे सेवानिवृत अधिकारी विलासराव बापूसाहेब काकडे (वय ७८) यांचे शनिवारी पहाटे १.३० वाजण्याच्या सुमारास वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

नेवासा येथील ज्ञानेश्वर कॉलनीत स्थित असलेले कै.विलासराव काकडे यांच्या पच्यात पत्नी,दोन मुली,एक मुलगा,सून,सहा नातवंडे असा परिवार आहे.ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना येथे त्यांनी सलग ३५ वर्षे नोकरी केली.काकडे साहेब यांनी सेवानिवृत्त झाल्यानंतर वारकरी संप्रदायात हार्मोनियम वादक म्हणून किर्तनामध्ये सेवा दिली होती. त्यांच्या निधनाने वारकरी संप्रदायात हळहळ व्यक्त केली जात आहे.

नेवासा येथे झालेल्या अंत्यसंस्कार प्रसंगी नंदकिशोर महाराज खरात,ज्ञानेश्वर उद्योग समूहाच्या वतीने उपाध्यक्ष पांडुरंग अभंग,मारुतराव घुले पाटील पतसंस्थेच्या वतीने चेअरमन बबनराव धस,नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, अजित मुरकुटे,प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष सुधीर चव्हाण, भाजपच्या वतीने अनिल ताके,शिवसेनेच्या वतीने बालेंद्र पोतदार यांनी श्रद्धांजली वाहिली.अंत्यसंस्काराला मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

## भारतरत्न मदर तेरेसा इंग्रजी शाळेचे दहावीच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**गंगापूर :** शहरातील भारतरत्न मदर तेरेसा इंग्रजी शाळेतील दहावीच्या विद्यार्थ्यांचे शालांत प्रमाणपत्र परीक्षांमध्ये घवघवीत यश शाळेच्या १००% निकालाची परंपरा कायम राखत फेब्रुवारी-मार्च २०२६मध्ये घेण्यात आलेल्या बोर्ड परीक्षेत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन केले. ज्यामध्ये शाळेतील विद्यार्थी शेख नाझीम युनूस ९५.००% घेत प्रथम क्रमांक, सरोवर वैष्णवी ९३.६०% द्वितीय क्रमांक, निरपळ सई संतोष ९२.८०% कुमारी सुकाशे ईश्वरी बाबासाहेब ९२.८०% प्राप्त करत तृतीय क्रमांक पटकावला. तसेच निकालातील उल्लेखनीय बाब म्हणजे ९ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण प्राप्त केले.

शाळेतील ५५ विद्यार्थ्यांनी ७५% पेक्षा जास्त टक्केवारी घेऊन विशेष प्रावीण्य प्राप्त केले. तर ३४ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शाळेचे व्यवस्थापक फादर विल्फ्रेड सल्ढाणा, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अनुजा कुलकर्णी, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक गणेश झोजे, माध्यमिक विभागाचे किशोर पठाडे, प्रशांत उबाळे, अफसर शेख, मंजुषा पाटील, राणी भुसारे, अनम खान यांच्यासह आदी सर्व शिक्षकांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## माका शाळेचा दहावीचा निकाल ९१.५०%

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** माका येथील राजर्षी शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ९१.५०% टक्के लागला. प्रथम क्र.फुंदे सिद्धार्थ अर्जुन ८८.४०% द्वितीय- खेडकर कार्तिक संजय ८७.२०% तृतीय- क्षीरसागर चैताली सागरअप्पा ८४.४०% चतुर्थ आखाडे अमृता संजय ८२.२०% तर पाचवा सावंत सार्थक सुशील ८१.८०% गुण मिळवून गुणवत्ता सिद्ध केली आहे. विद्यालयातील एकूण १०६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते ,त्यापैकी ९७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत,१५ विद्यार्थी विशेष प्राविण्य,३८ प्रथम श्रेणीत तर ३५ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मुळा एज्युकेशन सोसायटीचे मार्गदर्शक या.खा. यशवंतरावजी गडाख, मार्गदर्शक या.आ. शंकरराव गडाख उपाध्यक्ष -उदयन गडाख, सचिव -उत्तम लोंढे, सहसचिव- डॉ विनायक देशमुख, प्रशासन अधिकारी -घुले, प्राचार्य जालिंदर शेटे, पर्यवेक्षक रावसाहेब भुसारी, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, माजी विद्यार्थी, शिक्षण प्रेमी नागरिक, ग्रामस्थ व शिक्षक -शिक्षकेतर सेवक वृंद यांनी अभिनंदन केले आहे.

### CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME
IDRESHI SHAHAJAD RASHID
(SECONDARY BOARD
CERTIFICATE)
TO NEW NAME AS
IDARESHI SHAHAJAD RASHID
(AADHAR NO. 4808 3405 7838)
FROM VIDE AFFIDAVIT
BEFORE NOTARY PUBLIC
KOPARGAON
PLACE: KOPARGAON
DATE : 09/05/2026

## न्यू इंग्लिश स्कूल देर्डे चांदवड विद्यालयाचा निकाल ९० टक्के

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित न्यू इंग्लिश स्कूल देर्डे चांदवड विद्यालयाने आपल्या यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा एकूण निकाल उत्कृष्ट लागला असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेचा झेंडा रोवला आहे. विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये श्रद्धा सोमनाथ खरात हीने ७४.२० % गुण प्राप्त करून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला. शिवानी शांताराम गायकवाड हिने ६९.८० % गुणांसह द्वितीय क्रमांक पटकावला, तर समृद्धी संजय रहाणे हीने ६९.६० % गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन माजी आमदार अशोकराव काळे, विश्वस्त, आमदार आशुतोष काळे, व्हा. चेअरमन छबुराव आव्हाड आणि संस्थेच्या सचिव सौ. चैतालीताई काळे, सोसायटीचे सर्व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य व इन्स्पेक्टर प्रा. नारायण बारे यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम

### कार्तिकी सोनवणे तालुक्यात प्रथम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय कृषी विद्यापीठ राहुरी एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुणवत्तेसह यश मिळवत संस्थेचा नावलौकिक उंचावला आहे.

विद्यालयातील कुमारी कार्तिकी अविनाश सोनवणे हिने ९८.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. याआधी तीने इयत्ता पाचवी मध्ये स्कॉलरशिप परीक्षेमध्ये राज्यात दहावा क्रमांक व इयत्ता आठवी मध्ये स्कॉलरशिप परीक्षेत राज्यात सातवा क्रमांक मिळवला होता तसेच तिने नवोदय परीक्षेत यश संपादन केले व सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाचे वतीने दिला जाणारा बहुमूल्य असा सावित्री कन्या पुरस्कार प्राप्त केला असल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण तुपविहीरे यांनी दिली. या उज्वल यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक यांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक अरूण तुपविहीरे ,उपमुख्याध्यापक बाळासाहेब डोंगरे ,पर्यवेक्षक मनोज बावा यांनी अभिनंदन केले. तसेच संस्थेचे अध्यक्ष तथा कुलगुरू डॉ. विलास खर्चे, सभापती डॉ. प्रमोद रसाळ, सचिव डॉ. महानंद माने व खजिनदार महेश घाडगे यांनी सर्वांचे कौतुक केले. तसेच वर्ग शिक्षक रवींद्र हरिश्चंद्रे एनसीसी शिक्षक संतोष जाधव क्रीडा शिक्षक घनश्याम सानप , तुकाराम जाधव व सर्व शिक्षकांनी यशाबद्दल तिचे अभिनंदन केले.

## श्रीरामपूर तालुक्याचा १० वीचा ८९.५८ टक्के निकाल; १४ शाळांचे १०० टक्के निकाल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी २०२६ मध्ये घेतलेल्या इयत्ता १० वी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, श्रीरामपूर तालुक्याचा एकूण निकाल ८९.५८ टक्के लागला आहे. तालुक्यातून एकूण ४ हजार १९७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती, पैकी ३ हजार ७६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष म्हणजे, तालुक्यातील १४ शाळांचे १०० टक्के निकाल लागले आहेत. सर्वात कमी निकाल स्मार्क सेकंडरी स्कूल महांकाळवडगाव माळेवाडी शाळेचा निकाल ० टक्के निकाल लागला असून २३ पैकी एकही विद्यार्थी उत्तीर्ण झाला नाही. श्रीरामपूर शहर ते तालुक्यातील माध्यमिक विद्यालयामध्ये शांतीलाल पाटणी विद्यालय श्रीरामपूर ६८.२३ टक्के, जेठाबाई टी. सोमय्या हायस्कूल स्कूल ७७.९१ टक्के, डी.डी. काचोळे माध्यमिक विद्यालय श्रीरामपूर ९४.८६ टक्के, भास्करराव गलांडे पाटील विद्यालय अशोकनगर ९१.८१ टक्के, यशवंत विद्यालय पढेगाव ८३.८७ टक्के, बेलापूर कंपनी हरेगाव विद्यालय ९४.४४ टक्के, भि. रा. खटोड कन्या विद्यालय ८९.०४ टक्के, श्री छत्रपती शिवाजी विद्यालय वडाळा महादेव ८७.९३ टक्के, संत तेरेजा हायस्कूल हरेगाव ९५.७१ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल टाकळीभान ८७.२६ टक्के, कर्मशी जेठाबाई सोमया हायस्कूल ७९.३८ टक्के, भास्करराव गलांडे पाटील विद्यालय उंदीरगाव ९० टक्के, सदुरु गंगागिरी विद्यालय नाऊर ९१.३० टक्के, बी. जी. कल्याणकर रात्र प्रशाला श्रीरामपूर ७५.८६ टक्के, श्री एकनाथ केशव आवटी विद्यालय मालुंजा ९४.५९ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल खंडाळा ८४.९३ टक्के, श्रीरामपूर एज्युकेशन सोसायटी हायस्कूल ७२.८६ टक्के, केशव गोविंद विद्यालय बेलापूर खुर्द ९२.७१ टक्के, श्री जगदंबा प्रसादिक विद्यालय भोकर ९५.८३ टक्के, न्यु इंग्लिश स्कूल कारेगाव ८९.२१ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल उक्कलगाव १०० टक्के, खासदार गोविंदराव उर्दू हायस्कूल ९७.४० टक्के, डी पॉल इंग्लिश स्कूल श्रीरामपूर १०० टक्के, संत तेरेजा बॉईज हायस्कूल हरेगाव ६५.३८ टक्के, प्रवरा विद्यानिकेतन विद्यालय फत्याबाद ८६.२० टक्के, रामराव आदिक पब्लिक स्कूल निपाणी वडगाव ९८.३३ टक्के, शंकरराव डावखर कन्या विद्यालय ८२.३५ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल निमगाव खैरी १०० टक्के, जानकीबाई वामनराव आदिक विद्यालय खानापूर ९६.६६ टक्के, जानकीबाई आदिक माध्यमिक विद्यालय अशोकनगर ७१.४२ टक्के, इंग्लिश स्कूल शिरसगाव ८८.१७ टक्के, स्वर्गवासी रघुनाथ पाटील औताडे माध्यमिक विद्यालय माळेवाडी ८६.९५ टक्के, प्रेमजी रतन्सी पटेल हायस्कूल ७३.२१ टक्के, काशिनाथ पाटील मुरकुटे विद्यालय कमालपूर १०० टक्के, न्यू इंग्लिश स्कूल भेर्डापूर ९३.७५ टक्के, न्यु इंग्लिश स्कूल मुठेवडगाव ९५ टक्के, गोंडेगाव माध्यमिक विद्यालय ९३.१५ टक्के, गोरक्षनाथ माध्यमिक विद्यालय खोकर ९७.९५ टक्के, वाघुजी रामजी पाटील विद्यालय बेलापूर खुर्द ९० टक्के, प्रवरा माध्यमिक विद्यालय गळनिंब १०० टक्के, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर उर्दू हायस्कूल बेलापूर ९७.६१ टक्के, ग्रामीण माध्यमिक विद्यालय टाकळीभान ९५.४५ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल माळेवाडी ९६.२२ टक्के, मॉडेल इंग्लिश स्कूल श्रीरामपूर १०० टक्के, ज्ञानदीप माध्यमिक विद्यालय दत्तनगर ७६.४७ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल मातापुर १०० टक्के, सेंट झेवियर हायस्कूल श्रीरामपूर १०० टक्के, आदर्श माध्यमिक विद्यालय गोंधवणी ९२.५० टक्के, बी. आर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय ८८.८८ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल भामाठाण ४१.१७ टक्के, इंग्लिश स्कूल १०० टक्के, पुण्यश्लोक अहिल्यादेवी माध्यमिक विद्यालय नायगाव ८४ टक्के, सेकंडरी स्कूल महांकालवडगाव माळेवाडी ० टक्के, हजरत एम एम हुसेन साहेब उर्दू हायस्कूल ९८.६३ टक्के, हजरत हाजी गुलाम रसूल भिकन शहा उर्दू हायस्कूल ९०.९० टक्के, दिव्या दयाचंद इंग्लिश मीडियम स्कूल भोकर १०० टक्के, विद्यानिकेतन इंग्लिश मीडियम स्कूल ९५.३८ टक्के, गुड शेफर्ड स्कूल १०० टक्के, अशोक इंग्लिश मीडियम स्कूल ९८.११ टक्के, सरस्वती इंटरनॅशनल स्कूल भैरवनाथ नगर ९८.३८ टक्के, आजमात फातिमा इंग्लिश स्कूल १०० टक्के, प्राईड अकेडमी इंग्लिश स्कूल वांगी १०० टक्के, अजिंक्य इंग्लिश स्कूल पढेगाव १०० टक्के असे या शाळांचे निकाल लागले आहेत.

## नशिबाची परिक्षा

**रविवार दि .१० मे २०२६**

### मिलनम डे

उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १९० १४५ ११८ | ०-४ | १५८ २४८ ४८६ | जोड ०५-१४-३९ ७६-४८ |

### कल्याण

उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२९ ४८० ६६० | २-५ | १४० १५३ ११३ | जोड २६-८५-६३-९०-५४ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १३० १४९ ४०० | ४-७ | १२४ १७९ १६० | जोड ४१-३७-५८-०२-७९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to [illegible] | 56[illegible] 06 15[illegible] | 14[illegible] 43 67[illegible] | 23[illegible] 45 50[illegible] | 133 77 890 | 26[illegible] 85 14[illegible] |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

द•ख•ल

## म्हस्के विद्यालय एस.एस.सी. परीक्षेचा ९१.२२% निकाल



**अहिल्यानगर** : जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगांव-ने संचलित काकासाहेब म्हस्के माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नागापूर आहिल्यानगर या विद्यालयाने फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या माध्यमिक प्रमाणपत्र (एस.एस.सी.) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. यंदा विद्यालयाचा एकूण निकाल ९१.२२ टक्के लागला आहे. या परीक्षेसाठी एकूण ११४विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १०४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विशेष योग्यता श्रेणी १५,प्रथम श्रेणीत २२, द्वितीय श्रेणीत ४७,तर तृतीय श्रेणीत १० विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. प्रथम क्रमांक चैतन्य थोरात ९३.६०%, द्वितीय क्रमांक अपूर्वा नारखेडे ९२.४०%, तृतीय क्रमांक आदित्य काळे व अंजली बडे ८८.४०% गुण मिळवून विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष मा. आ. डॉ. नरेंद्रजी घुले पा. , मा. आ. चंद्रशेखर घुले पा. , जि.प. अध्यक्षा ना. सौ. राजश्रीताई घुले पा., पं. स. सभापती डॉ. क्षितिज (भैय्या) घुले पा, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी के. वाय. नजन सर, संस्था समन्वयक विजय काशिद सर, प्राचार्या सौ. शितल बांगर तसेच प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सुनंदा धामणे यांनी अभिनंदन केले. विद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धतीमुळे आणि शिक्षकांच्या परिश्रमांमुळेच हा यशाचा आलेख उंचावत असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

## श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेचा दहावीचा निकाल शंभर टक्के

**अहिल्यानगर** : सावेडी येथील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, माध्यमिक विभाग यांनी सन २०२५-२६ च्या इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत दैदीप्यमान यश संपादन केले आहे. परीक्षेसाठी प्रविष्ट झालेल्या सर्व २३२ विद्यार्थ्यांनी यश मिळवत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या उल्लेखनीय यशामुळे विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यंदाच्या निकालामध्ये विद्यालयातील १२२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले असून ६५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तसेच ३६ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी तर ९ विद्यार्थ्यांनी पास क्लासमध्ये यश संपादन केले आहे. सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची मेहनत यामुळे हा अभिमानास्पद निकाल लागल्याची भावना व्यक्त होत आहे. विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. श्रावणी गणेश दळवी हिने ९७.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. मंजुषा महेश बोरकर हिने ९६.८० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर कु. ईश्वरी सुनील पवार हिने ९६.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. या तिन्ही विद्यार्थिनींचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. विद्यालयाच्या प्राचार्या वसुधा सुनील जोशी यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देत वर्षभर विविध उपक्रम, सराव परीक्षा, शैक्षणिक नियोजन आणि वैयक्तिक मार्गदर्शन यावर विशेष भर दिला. विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री लक्ष्मीकांत कुलकर्णी यांनी संपूर्ण शैक्षणिक वर्षभर अभ्यासाचे काटेकोर नियोजन केले.

## भगवान विद्यालयाचा एसएससी निकाल ९७.२४% गोल्हार वैष्णवी पंपू ९०.८०% गुणांसह प्रथम

**खरवंडी कासार** : श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्ट संचलित श्री भगवान विद्यालय भगवानगड, खरवंडी कासार, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर या विद्यालयाचा फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या एसएससी बोर्ड परीक्षेचा निकाल ९७.२४% लागला आहे. विद्यालयातून कु. गोल्हार वैष्णवी पंपू हिने ९०.८०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. ढाकणे ऋतुजा बाबुराव ८९.८०% गुणांसह द्वितीय तर धारकर समर्थ दत्तात्रय ८९% गुणांसह तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. विद्यालयाच्या या घवघवीत यशाबद्दल श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टचे अध्यक्ष, ट्रस्ट मंडळ, स्कूल कमिटी सदस्य, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे. भगवान बाबांच्या आशीर्वादाने विद्यालयाची यशाची परंपरा कायम राहील असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## शिक्षणशास्त्र विषयात राहुल गायकवाड यांना पीएच.डी. प्रदान

**अहिल्यानगर :** येथील राहुल रतन गायकवाड यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने शिक्षणशास्त्र विषयात पीएच.



डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या संशोधन कार्यासाठी डॉ. गायत्री गोरक्षनाथ चौकडे आणि प्रा. संजीव सोनावणे यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले. संशोधन कार्यादरम्यान मार्गदर्शक आणि संशोधक यांना नॉर्वे आणि फिनलंड या देशांमध्ये अभ्यास व शैक्षणिक निरीक्षण करण्याची संधी मिळाली. आंतरराष्ट्रीय शैक्षणिक अनुभवामुळे त्यांच्या संशोधनाला अधिक व्यापक दृष्टी प्राप्त झाली. बदलत्या शैक्षणिक परिस्थितीत आणि नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## श्री संतुकनाथ इंग्लिश विद्यालयाचा ९६ टक्के निकाल



**नगर तालुका** : नगर तालुक्यातील जेऊर येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री संतुकनाथ इंग्लिश विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ९६ टक्के लागला आहे. जेऊर परीक्षा केंद्र हे कॉपी नियुक्त केंद्र म्हणून ओळखले जाते. या परीक्षेत सायली ससे हिने ९२.८० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तौफिकअली वाजिद सय्यद याने ९१.६० टक्के द्वितीय क्रमांक तर स्नेहल शेटे आणि तुषार शिंदे यांनी प्रत्येकी ९०.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. जान्हवी सुधीर पवार हिने ८३.४० टक्के गुण मिळवून विशेष संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक शांताराम नवले, उपमुख्याध्यापक अरविंद सोनावळे पर्यवेक्षक कैलास आठरे सर्व विषय शिक्षक, स्कूल कमिटी सदस्य, सल्लागार समिती सदस्य. शालेय व्यवस्थापन समिती, शिक्षक पालक संघ, सरपंच ज्योती तोडमल, उपसरपंच अनिता बनकर, सर्व ग्रामपंचायत सदस्य, मधुकर मगर, बंडू पवार, सुनील पवार, माजी विदयार्थी, पंचक्रोशीतील'पालक व ग्रामस्थांकडून विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

# एलईडी व तिरंगा लाईटने उजळला तारकपूर रस्ता

## विकासकामांतून अहिल्यानगरची प्रकाशाकडे वाटचाल : पालकमंत्री विखे पाटील

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील महत्त्वाचा वाहतूक मार्ग असलेला तारकपूर रस्ता आता एलईडी पथदिवे आणि तिरंगा लाईटने उजळून निघाला आहे. डीएसपी चौक ते पत्रकार चौक दरम्यान बसविण्यात आलेल्या आधुनिक एलईडी पथदिव्यांच्या लोकार्पण सोहळ्याचे उद्घाटन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

तारकपूर रस्ता हा मनमाड महामार्गाला जोडणारा तसेच शहरातील विविध भागांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने या मार्गाच्या विकासासाठी आमदार संग्राम जगताप यांनी राज्य शासनाच्या माध्यमातून मोठा निधी उपलब्ध करून दिला. त्या निधीतून रस्ता कॉंक्रिटीकरण, दुभाजक, पावसाच्या पाण्यासाठी गटर, तसेच फुटपाथची कामे पूर्ण करण्यात आली. त्यानंतर आता एलईडी पथदिवे व तिरंगा लाईट बसवून या रस्त्याचे सुशोभीकरण करण्यात आले आहे.

या लोकार्पण सोहळ्याला आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ड. धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे, स्थायी समिती सभापती पैलवान सुभाष लोंढे, महिला बालकल्याण समिती उपसभापती वर्षा सानप, नगरसेवक मोहित पंजाबी, जितू गंभीर, जय भोसले, नगरसेविका शारदाताई ढवण, सुजाता पडोळे तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, अहिल्यानगर शहर विकासकामांच्या माध्यमातून वेगाने बदलत असून प्रकाशाकडे वाटचाल करत आहे. तारकपूर रस्त्याचे कॉंक्रिटीकरण आणि एलईडी पथदिव्यांमुळे शहराच्या वैभवात भर पडली आहे.

आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की, तारकपूर रस्ता हा सावेडी उपनगराला जोडणारा तसेच




छत्रपती संभाजीनगर व मनमाड महामार्गाला जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने नागरिकांना अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. एलईडी व तिरंगा लाईटमुळे हा परिसर उजळून निघाला असून सुशोभीकरणाचे रूप प्राप्त झाले आहे. विकासकामांच्या माध्यमातून अहिल्यानगर शहर प्रकाशाकडे वाटचाल करत आहे.

# ॲलेक्स कपमध्ये फिरोदिया युनायटेड व गुलमोहरची अंतिम फेरीत धडक

## किल्ला मैदानावर रंगला फुटबॉलचा थरार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** शहरातील ऐतिहासिक भुईकोट किल्ला मैदानावर सुरू असलेल्या लेक्स कपच्या ८ व्या पर्वातील फुटबॉल स्पर्धेत उपांत्य फेरीचे सामने अत्यंत रंगतदार व चुरशीचे झाले. दि. ८ मे रोजी झालेल्या उपांत्य फेरीतील लढतींमध्ये फिरोदिया शिवाजीयन्स युनायटेड आणि गुलमोहर स्पोर्ट्स क्लब या संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर मात करत अंतिम फेरीत धडक मारली. आता या दोन्ही तुल्यबळ संघांमध्ये होणाऱ्या अंतिम सामन्याकडे फुटबॉलप्रेमींचे लक्ष लागले आहे.

उपांत्य फेरीतील पहिला सामना फिरोदिया शिवाजीयन्स युनायटेड आणि फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी यांच्यात झाला. सुरुवातीपासूनच दोन्ही संघांनी आक्रमक आणि बचावात्मक खेळाचा उत्कृष्ट संगम दाखवत एकमेकांना जोरदार झुंज दिली. मैदानावर चेंडूसाठी चुरस, जलद पासिंग आणि गोल करण्यासाठी दोन्ही संघांचे सातत्यपूर्ण प्रयत्न यामुळे सामना अत्यंत रोमांचक झाला.

संपूर्ण वेळेत दोन्ही संघांना गोल करण्यात अपयश आल्याने सामना ०-० असा बरोबरीत राहिला. त्यामुळे निकालासाठी टायब्रेकरचा आधार घ्यावा लागला. टायब्रेकरमध्ये फिरोदिया शिवाजीयन्स युनायटेड संघाने संयम राखत अचूक खेळ केला आणि ४-२ अशा फरकाने विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश निश्चित केला. फिरोदिया शिवाजीयन्स युनायटेड संघाकडून उत्कर्ष सोनवणे, भानुदास चंद, नील धेंडवाल आणि अनोश कामाठी यांनी प्रत्येकी एक गोल करत संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. तर फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी संघाकडून निकोलस आणि रोनाल्ड यांनी प्रत्येकी एक गोल नोंदविला.

दुसरा उपांत्य फेरीतील सामना फिरोदिया शिवाजीयन्स फुटबॉल क्लब आणि गुलमोहर स्पोर्ट्स क्लब यांच्यात रंगला.

# चिचोंडी शिराळ ग्रामस्थांकडून आमदार अक्षय कर्डिले यांचा सत्कार



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिराळ चिचोंडी :** राहुरी नगर पाथर्डी विधानसभा मतदारसंघाच्या नवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे उमेदवार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांची एक लाख बारा हजार मताच्या फरकाने दणदणीत विजय मिळवल्यानंतर पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला

यावेळी ग्रामस्थांनी दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या कार्याचा विशेष उल्लेख केला. पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी या गावावर साहेबांचे विशेष प्रेम होते. विविध विकास कामाच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण भागातील जनतेचा विश्वास संपादन केला होता. त्यांच्या कार्यशक्ती आणि जनतेशी असलेल्या घट्ट नात्यामुळे पोटनिवडणुकीत देखील मतदारांनी त्यांचे सुपुत्र अक्षय कर्डिले यांच्यावर विश्वास दाखवत मोठे मताधिक्य दिल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

सत्कार कार्यक्रमास भाजप कार्यकर्ते तसेच मिरी तिसगाव प्रादेशिक पाणी योजनेचे अध्यक्ष एकनाथराव आटकर, चिचोंडी ग्रामपंचायतचे उपसरपंच आबा गरुड, ग्रामपंचायत सदस्य संदीप दानवे, इब्राहिम शेख, पप्पू फिटर पत्रकार रमेश पाथरकर, रावसाहेब कांबळे, सोन्याबापु जराड, अक्षय डोळसे, बाळासाहेब जराड, पिनू भिंगारदिवे, संजय शिंदे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## दहावीच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान



**लिंपणगाव :** लोणी व्यंकनाथ ग्रामपंचायतच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थी एच एस सी च्या ५ आणि एसएससी च्या १० अशा १५ विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी लोणी ग्रामपंचायतच्या महिला सरपंच सौ मनीषा नाहाटा यांच्या अध्यक्षतेखाली या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सन्मान सोहळ्यास राज्य बाजार समितीचे सभापती बाळासाहेब नहाटा, उपसरपंच चित्राताई धाकड, पवार लोणी संस्थेचे माजी चेअरमन लालासाहेब दादा काकडे, तंटामुक्तीचे अध्यक्ष ज्ञानदेव बापू मगर, महालक्ष्मी उद्योग समूहाचे सर्वेसर्वा गावचे पोलीस पाटील मनीष पाटील जगताप, ग्रामपंचायत सदस्य नीलिमा थोरात तंटामुक्ती अध्यक्ष ज्ञानदेव मगर राहुल गोरखे, गणेश काकडे, प्राचार्य बाळासाहेब जठार सर, संदीप दळवी सर, निसार शेख, पुष्पलता काकडे मॅडम, तसेच ग्रामपंचायत सदस्य संतोष काकडे , अनिल खेडेकर, गणेश गायकवाड सर, पत्रकार नंदकुमार कुरुमकर, सत्कारमूर्ती , गावातील सर्व ग्रामस्थ विद्यार्थी, विद्यार्थिनी त्यांच्या सर्व पालक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. यावेळी राज्य बाजार समितीचे सभापती बाळासाहेब नहाटा म्हणाले की, दहावीच्या मुलांसाठी प्राचार्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खूप कष्ट घेतले. म्हणूनच विद्यालयाने दहावीच्या निकालाची परंपरा कायम ठेवली ही अभिमानाची बाब आहे.यावेळी विद्यालयाची यशस्वी विद्यार्थिनी वैष्णवी गोरखे या विद्यार्थिनीला दत्तक घेऊन आपण पुढील शालेय शिक्षणासाठी सर्व खर्च करणार असल्याचे नहाटा यांनी यावेळी सांगितले.

# पीडित साळवे कुटुंबीय हल्लेखोरांच्या नातेवाईकांकडून टार्गेट

## खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी ; पोलीस अधीक्षकांना निवेदन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** खुनाचा प्रयत्न व ट्रॉसिटीसारख्या गंभीर गुन्ह्यात सध्या कारागृहात असलेल्या आरोपींच्या नातेवाईकांकडून फिर्यादी, जखमी व साक्षीदारांवर गुन्हे मागे घेण्यासाठी दबाव आणला जात असून, खोट्या गुन्ह्यांत अडकविण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप रिपब्लिकन पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे. यासंदर्भात रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे व सुरेंद्र थोरात यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, जामखेड तालुक्यातील नान्नज येथे २४ ऑगस्ट २०२५ रोजी सुनील साळवे यांच्या कुटुंबावर जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात सहा जण गंभीर जखमी झाले होते. जखमींमध्ये महिला व लहान मुलांचाही समावेश होता. या प्रकरणात खुनाचा प्रयत्न तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले असून संबंधित आरोपी सध्या कारागृहात आहेत.

मात्र, आरोपींच्या नातेवाईकांकडून आता पीडित कुटुंबीय व साक्षीदारांवर दबाव आणला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. केस मागे घ्या, अन्यथा तुमच्यावर विनयभंगासारखे गंभीर गुन्हे दाखल करू, अशा प्रकारच्या धमक्या दिल्या जात आहे. तसेच जामखेड पोलीस ठाण्यात जखमी व साक्षीदारांविरुद्ध खोटे गुन्हे दाखल करण्यासाठी पोलिसांवर दबाव आणला जात असल्याचाही आरोप करण्यात आला.

सुनील साळवे यांनी सांगितले की, मागील हल्ल्यात त्यांच्या मुलाच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली असून पत्नीचा हात निकामी झाला आहे. आजही त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. आधीच कुटुंबावर मोठा अन्याय झाला असताना पुन्हा खोट्या गुन्ह्यांद्वारे त्रास देण्याचा प्रयत्न होत आहे. पोलीसांनी गुन्हे दाखल होत असताना निपक्षपातीपणे चौकशी करुन न्याय द्यावा. तसेच हल्लेखोरांच्या नातेवाईकाकडून देखील जीवाला धोका असल्याने संरक्षण देण्याची मागणी त्यांनी केली.

पीडित कुटुंबीय किंवा साक्षीदारांवर खोटे गुन्हे दाखल झाल्यास जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा रिपब्लिकन पक्षाच्या वतीने यावेळी देण्यात आला आहे.

# सावेडी नाका बस स्थानकाच्या इमारतीचे भूमिपूजन उत्साहात संपन्न

## प्रवाशांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध होणार - पालकमंत्री विखे पाटील

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सावेडी नाका बस स्थानकाच्या इमारतीच्या कामाला अखेर मुहूर्त लागला असून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा उत्साहात संपन्न झाला. आ. संग्राम जगताप यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या महत्त्वाच्या कामाला चालना मिळाल्याचे यावेळी त्यानी सुचित केले.

यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की,

सावेडी बस स्थानकाच्या माध्यमातून प्रवाशांची मोठी सोय होणार आहे. अनेक ठिकाणी बस

### पाच कोटींच्या निधीतून बसस्थानक उभारणी; सावेडी उपनगराला दिलासा

स्थानकांची अवस्था वाईट असून अस्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर असतो. मात्र आता एसटी महामंडळ प्रवाशांसाठी दर्जेदार सुविधा देण्यावर भर देत आहे. शिवशाही, शिवाई, इलेक्ट्रिक बस, लाल परी आणि हिरकणी बस अशा विविध सेवांमुळे प्रवाशांना अधिक चांगला अनुभव मिळत आहे.

ते पुढे म्हणाले की, प्रवाशांच्या गरजा लक्षात घेऊन महिलांना ५० टक्के सवलत, ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास अशी सुविधा देण्यात आली आहे. सुरक्षित व सुलभ प्रवासामुळे नागरिकांचा एसटीकडे ओढा वाढला असून महामंडळही फायद्यात येत आहे.

आ. संग्राम जगताप यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या माध्यमातून सावेडी बस स्थानकासाठी सुमारे पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. सावेडी उपनगराचा विस्तार झपाट्याने होत असून या भागात नागरिकांची संख्या वाढत आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सोयीसाठी सावेडी नाका येथे बस स्थानक उभारण्याचा निर्णय घेण्यात



आला आहे. या ठिकाणावरून नागरिकांना सहज प्रवास करता येईल. शासनाच्या सुविधा नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

या भूमिपूजन सोहळ्यास आ. संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ड. धनंजय जाधव, महिला बालकल्याण उपसभापती वर्षा सानप, माजी महापौर बाबासाहेब वाकळे माजी उपमहापौर अनिल बोरुडे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, मनोज कोतकर, सुरेश बनसोडे, मनोज दुल्लम, महेश लोंढे, विनायक देशमुख, रवींद्र बारस्कर, करण कराळे, दत्ता गाडळकर, नगरसेविका शारदाताई ढवण, सुजाता पडोळे आदी उपस्थित होते.

द•ख•ल

## लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी चंद्रकांतदादा पाटलांचे पाऊल



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे:** राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज स्वतःचे एसआयआर (Special Intensive Revision) मॅपिंग आज कोथरुड मध्ये पूर्ण केले. मतदार यादी अद्ययावत करण्याच्या या प्रक्रियेत स्वतः सहभाग नोंदवून, त्यांनी पुणेकर आणि राज्यातील नागरिकांसमोर एक आदर्श ठेवला आहे. मतदार यादीतील पारदर्शकता आणि अचूकता वाढवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार एसआयआर मॅपिंग मोहीम राबवली जात आहे. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आपल्या मतदार ओळखपत्रातील माहितीची पडताळणी करून, हे मॅपिंग यशस्वीपणे पूर्ण केले. यामुळे त्यांची मतदार यादीतील माहिति आता पूर्णपणे सुरक्षित आणि अद्ययावत झाली आहे.

''लोकशाहीत मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी मतदार यादीत आपले नाव अचूक असणे आवश्यक आहे. मी माझे एसआयआर मॅपिंग पूर्ण केले आहे, आता आपली बारी आहे. दुबार नावे टाळण्यासाठी आणि मतदार यादीतील गोंधळ कायमचा दूर करण्यासाठी सर्व नागरिकांनी तातडीने आपले मॅपिंग पूर्ण करावे.'' असे आवाहन ना. पाटील यांनी सर्व मतदार बांधवांना केले.

## विकास लवांडे यांच्यावर शाईफेक आळंदीत राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेसकडून तीव्र निषेध

**आळंदी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर आळंदी म्हातोबा येथे झालेल्या शाईफेक प्रकरणाच्या निषेधार्थ आळंदी देवाची येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांसह ग्रामस्थांनी एकत्र येत तीव्र निषेध आंदोलन केले. तथाकथित संग्राम भंडारे याने विकास लवांडे यांच्यावर शाईफेक



केल्याचा आरोप करण्यात आला असून, या घटनेमुळे राजकीय वातावरण तापले आहे. संबंधित प्रकाराचा निषेध करत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. या निषेध आंदोलनात आळंदी शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष विलास कुराडे, आळंदी शहर काँग्रेसचे अध्यक्ष संदीप नाईकरे, संजय वडगावकर, अर्जुन मेदनकर, योगीराज सातपुते, विश्वंभर शिंदे, सुदीप गरुड यांच्यासह आळंदीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. राजकीय मतभेद असू शकतात; मात्र अशा प्रकारच्या कृत्यांना लोकशाहीत स्थान नाही, अशी प्रतिक्रिया काँग्रेस शहराध्यक्ष संदीप नाईकरे पाटील यांनी व्यक्त केली.

## न्यू इंग्लिश स्कूल खामुंडी चा दहावी परीक्षेत सलग घवघवीत यश

### १०० टक्के निकालाची परंपरा कायम

**आळेफाटा :–** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (डडउ) इ. १० वी परीक्षेचा निकाल शुक्रवार दि. ८ मे रोजी जाहीर झाला. यामध्ये खामुंडी येथील न्यू इंग्लिश स्कूल ने पुन्हा एकदा १००% निकाल लावत उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्या मध्ये प्रथम क्रमांक समृद्धी गणेश शिंगोटे, द्वितीय सार्थक उत्तम गंभीर, तृतीय अलिशान परवेज मोमीन, चौथा कावेरी पुराणिक नलावडे आणी पाचवा क्रमांक रिया रवींद्र शिंदे यांनी पटकावला आहे. शाळेतील विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीतही चमकदार कामगिरी केली असून अनेक विद्यार्थी विशेष प्राविण्य व प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. शाळेचे मुख्याध्यापक बाळू बांगर, शिक्षक सुवर्णा नांगरे,सुनीता वर्पे, राजेंद्र शिंदे, संजय आहेर हे म्हणाले की , ''हा निकाल विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यांचे फलित आहे. शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी नेहमीच कटिबद्ध राहिली आहे आणि यापुढेही हा वारसा जपला जाईल.'' या यशाबद्दल संस्थाचालक, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. निकालानंतर शाळेत आनंदाचे वातावरण असून विद्यार्थ्यांनी एकमेकांना पेढे भरवून आनंद साजरा केला. गावकऱ्यांनीही शाळेच्या यशाबद्दल समाधान व्यक्त केले.

# बेलसरच्या शिलालेखांत दडलेला स्वराज्याचा 'विजयी' इतिहास जगासमोर येणार

## खासदार सुळे यांनी घेतली दखल!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** हिंदवी स्वराज्याच्या इतिहासातील पहिली मोठी लढाई जिथे लढली गेली आणि जिथे शिवरायांच्या शिलेदारांनी विजापूरच्या फत्तेखानाला अस्मान दाखवले, त्या बेलसरच्या रणभूमीला आता ऐतिहासिक वैभव प्राप्त करून देण्याचा निर्धार खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केला आहे. बेलसर येथील घुमटेश्वर समाधी मंदिरे आणि त्यावरील दुर्मीळ शिलालेखांची पाहणी केल्यानंतर त्यांनी हा ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याचे आश्वासन दिले.

इतिहासाची सुवर्णपाने: बेलसरची लढाई : इतिहासाच्या पाऊलखुणा शोधताना बेलसरचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. स्वराज्य संकल्पक शहाजीराजे यांचे सरदार महिमाकार खंडोजी पाटील–गरूड आणि सोनजी बीन कावजी पाटील–गरूड यांनी ११ मे १६४८ रोजी कऱ्हा नदीच्या काठी फत्तेखानाच्या छावणीवर झडप घालून स्वराज्याला पहिला मोठा विजय मिळवून दिला होता. 'खरी जंत्री' आणि येथील ऐतिहासिक शिलालेखांवर या विजयाची नोंद आहे. घटनेच्या तरतुदीनुसार संवर्धनाचे आश्वासन : सध्या ही ऐतिहासिक स्थळे निसर्गाच्या प्रभावामुळे आणि देखभालीअभावी झिजत आहेत. याकडे लक्ष वेधताना खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, ''भारतीय राज्यघटनेच्या कलम ४९ नुसार अशा ऐतिहासिक स्मारकांचे संरक्षण करणे हे राज्य आणि नागरिक म्हणून आपले कर्तव्य आहे. येथील शिलालेख, समाधी चोपाळ आणि स्मृती विरगळ हे केवळ दगड नसून ते आपल्या पराक्रमाचे दस्तऐवज आहेत.''

प्रमुख उपस्थिती : या पाहणी दरम्यान माजी अध्यक्ष जिल्हा परिषद विजयराव कोलते, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष माणिक झेंडे–पाटील, इतिहास तज्ज्ञ विजय पाटील–गरूड, शहाजी गरूड, विलास गरूड, बाळासाहेब गरूड, प्रकाश गरूड, धनंजय गरूड आणि गाव कामगार तलाठी सचिन जगताप यांच्यासह अनेक मान्यवर आणि शिवप्रेमी ग्रामस्थ उपस्थित होते.

**''पुरंदरच्या या पावन भूमीने स्वराज्याचा पाया मजबूत केला आहे. बेलसरच्या मातीतील हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. शिवमंदिर दुरुस्ती आणि स्मारकाच्या सुशोभीकरणासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल.''**
**` खासदार सुप्रिया सुळे**

**इतिहास काय सांगतो?**
**विजापूरचा सरदार फत्तेखान जेव्हा स्वराज्यावर चालून आला, तेव्हा बेलसरच्या या रणभूमीवर गनिमी काव्याने त्याचा पराभव करण्यात आला होता. खंडोजी पाटील–गरूड आणि सोनजी कावजी यांसारख्या वीरांनी दाखवलेल्या शौर्यामुळेच स्वराज्याचा आत्मविश्वास वाढला होता. हीच शौर्यगाथा आता बेलसरच्या स्मारकातून पुन्हा जिवंत होणार आहे.**



बेलसर येथील ऐतिहासिक ठेव्याची माहिती घेताना खासदार सुप्रिया सुळे. सोबत इतिहास अभ्यासक विजयभाऊ पाटील–गरूड आणि अन्य मान्यवर.

## निरगुडसर परिसरात दीडशे मीटर रस्ता अचानक उंचावला ; अपघात होण्याची शक्यता

### ठेकेदाराचे मनमानी काम ; माजी मंत्री दिलीप वळसे पाटलांच्या सूचनेकडेही दुर्लक्ष

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** अवसरी फाटा ते जांबुत या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटकरणाचे काम सध्या सुरू असून, या कामासाठी राज्य शासनाकडून तब्बल ४१८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मात्र अवसरी–निरगुडसर परिसरात सुरू असलेले काम अतिशय संथ गतीने व ठेकेदाराच्या सोयीनुसार होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

रस्त्याचे खोदकाम करताना ज्या ठिकाणी मुबलक मुरूम उपलब्ध आहे, त्या भागात मोठ्या प्रमाणात खोदकाम केले जात आहे. मात्र दोन्ही बाजूंनी समान प्रमाणात काम न करता एकाच बाजूने अधिक रस्ता उकरला जात असल्याने त्या बाजूच्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर परिणाम होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. ज्या ठिकाणी मुरूम कमी आहे, त्या ठिकाणी काम टाळले जात असल्याचाही



आरोप नागरिकांनी केला आहे. दरम्यान, निरगुडसर परिसरातील एका भागात सुमारे दीडशे मीटर अंतराचा रस्ता अचानक चार ते पाच फूट उंच करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या भागाच्या पुढे आणि मागे रस्त्याची पातळी पुन्हा खाली करण्यात आली आहे. त्यामुळे नेमका हा छोटाच भाग एवढ्या उंचीवर का नेण्यात आला, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम व नाराजी निर्माण झाली आहे. स्थानिकांच्या मते, कोणतेही योग्य नियोजन किंवा ग्रामस्थांशी चर्चा न करता हा भाग उंचावण्यात आल्याने रस्त्याची रचना विस्कळीत झाली आहे. या उंचावलेल्या रस्त्यामुळे लगतची घरे चार ते पाच फूट खोल गेल्यासारखी दिसत असून, नागरिकांना घरातून थेट रस्त्यावर येणे अत्यंत कठीण झाले आहे. अनेक ठिकाणी दुचाकी व चारचाकी वाहने घराबाहेर काढताना मोठी कसरत करावी लागत आहे. उंच चढावरून वाहन काढताना तोल जाऊन काही नागरिक दुचाकीवरून पडल्याच्या घटनाही घडल्या आहेत. याबाबत संबंधित नागरिकांनी राज्याचे माजी गृहमंत्री व स्थानिक लोकप्रतिनिधी दिलीप वळसे पाटील यांना सुमारे महिनाभरापूर्वी निवेदन दिले होते. त्यावेळी त्यांनी संबंधित ठेकेदारांना सूचना देऊन ग्रामस्थांशी चर्चा करून काम करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अद्याप त्याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, वारंवार होणाऱ्या अपघातांना जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने तसेच संबंधित ठेकेदाराने तातडीने लक्ष घालून रस्त्याचे काम नियोजनबद्ध व सुरक्षित पद्धतीने करावे, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

निरगुडसर ता. आंबेगाव येथील परिसरात सुमारे चार ते पाच फूट खोल गेलेली घरे.

## पुरंदर उपसा जलसिंचन योजनेची लाइन दुसऱ्यांदा फुटली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**दिवे, पुरंदर :** दिवे परिसरातील शेतकऱ्यांनी पुरंदर उपसा जलसिंचन योजनेच्या माध्यमातून सिताफळ बागांसह नगदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नियोजन केले आहे. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार परिसरात पाणीपुरवठा सुरू करण्यात आला असला तरी जाधववाडी परिसरात पंधरा दिवसांत दुसऱ्यांदा पाइपलाइन फुटल्याने शेतकरी हैराण झाले आहेत. गुरुवारी तब्बल तीन ठिकाणी पाइपलाइन फुटल्याने शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे. शेतकऱ्यांच्या मते संबंधित पाइपलाइन सुरुवातीपासूनच चुकीच्या पद्धतीने टाकण्यात आल्याने ती वारंवार फुटत आहे. या लाइनची दुरुस्ती नेमकी कोण करणार हा प्रश्न कायम आहे. पाटबंधारे विभागाकडून दुरुस्ती होत नसल्याने शेतकरी स्वतः लोकवर्गणीतून पाइपलाइन दुरुस्त करत आहेत. आतापर्यंत लाखो रुपये खर्च करून अनेकवेळा दुरुस्ती करण्यात आली आहे. पुरंदर उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित झाल्यापासून ही पाइपलाइन सातत्याने फुटत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. आता पुन्हा मोठ्या प्रमाणात दुरुस्तीची आवश्यकता निर्माण झाली असून त्यासाठी मोठा खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे संबंधित पाइपलाइनची तातडीने दुरुस्ती पाटबंधारे विभागाने करावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार जाधववाडी ते पवारवाडी दरम्यानची लाइन लोखंडी पाइपमध्ये करण्यात आल्यास शेवटच्या टप्प्यापर्यंत पूर्ण दाबाने पाणी पोहोचू शकते. सध्या असलेल्या पाइपलाइनमुळे पाण्याचा दाब कमी होत असून शेतीला पुरेसा लाभ मिळत नाही. दरम्यान, दिवे पंपहाऊस ते काशीनाथ झेंडे यांच्या वस्तीपर्यंत नवीन पाइपलाइन टाकण्यात आली आहे.

## रखडलेला श्रेयाचा दहावीचा निकाल अखेर जाहीर

जेजुरी : राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता दहावीचा निकाल ८ मे रोजी जाहीर केला. राज्यभर विद्यार्थ्यांनी आनंद साजरा केला असताना जेजुरी येथील विद्यार्थिनी श्रेया संतोष वाईकर हिचा निकाल मात्र तांत्रिक अडचणीमुळे रखडल्याची घटना समोर आली. अखेर पुणे बोर्डाच्या कार्यालयात दोन दिवस पाठपुरावा केल्यानंतर शनिवारी सायंकाळी तिचा निकाल जाहीर करण्यात आला. जेजुरी येथील जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलची विद्यार्थिनी श्रेया वाईकर हिने जिजामाता हायस्कूल परीक्षा केंद्रावरून दहावीची परीक्षा दिली होती. इतर सर्व विद्यार्थ्यांचे निकाल ऑनलाईन प्रसिद्ध झाले होते. मात्र श्रेयाचा निकाल संकेतस्थळावर दिसत नसल्याने तिच्यासह पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. पालकांनी शुक्रवारी पुणे येथील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या कार्यालयात धाव घेतली. यावेळी पालकांनी अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदवली. बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी काही तांत्रिक अडचणींमुळे निकाल प्रदर्शित होण्यास विलंब झाल्याचे सांगितले. बराच वेळ प्रतीक्षा केल्यानंतर सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास सहाय्यक सचिव वैशाली काळे यांनी श्रेयाच्या तात्पुरत्या निकालपत्राची प्रत तिच्या वडिलांकडे सुपूर्द केली. यात श्रेयाला ८७.८० टक्के गुण मिळाल्याचे स्पष्ट झाले. निकालाची माहिती मिळताच श्रेया, तिचे कुटुंबीय व शिक्षकांनी जल्लोष केला.



## सासवड नगरपालिकेची ऐतिहासिक 'सौर' भरारी ६५० किलोवॅटचा ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे :** सासवड शहराच्या शाश्वत विकासासाठी आणि नगरपालिकेच्या तिजोरीवरील आर्थिक ताण कमी करण्यासाठी एक क्रांतिकारी पाऊल उचलण्यात आले आहे. शहराच्या पाणीपुरवठा योजनेला सौर ऊर्जे ची जोड देणाऱ्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पातील सर्वात महत्त्वाचा तांत्रिक टप्पा यशस्वीपणे पूर्ण झाला आहे. पाणीपुरवठा केंद्रावर ६५० किलोवॅट क्षमतेचा नवीन ट्रान्सफॉर्मर बसवून तो कार्यान्वित करण्यात आला आहे. यामुळे आता सासवडचा पाणीपुरवठा थेट सूर्याच्या ऊर्जेवर चालणार असून, नगरपालिकेने 'ग्रीन सिटी'च्या दिशेने मोठी झेप घेतली आहे. वाढत्या शहरीकरणामुळे सासवड नगरपरिषदेला पाणीपुरवठ्यासाठी दरमहा लाखो रुपयांचे वीज बिल महावितरणला भरावे लागत होते. या वाढत्या खर्चाला कायमस्वरूपी लगाम घालण्यासाठी लोकनियुक्त नगराध्यक्षा श्रीमती आनंदी चंद्रकांत जगताप यांनी पाणीपुरवठा केंद्रावर सौर ऊर्जा प्रकल्प राबवण्याचे नियोजन केले होते. या प्रकल्पाचा कणा असलेला ६५० किलोवॅट क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसवल्यामुळे सौर पॅनेलद्वारे निर्माण होणारी वीज आता मुख्य वीज यंत्रणेत प्रवाहित होण्यास सुरुवात झाली आहे. या ट्रान्सफॉर्मरमुळे सौर ऊर्जेच्या वहनातील सर्व तांत्रिक अडचणी दूर झाल्या आहेत. विकासासाठी हक्काचा निधी उपलब्ध: या प्रकल्पामुळे नगरपालिकेच्या वार्षिक वीज बिलात सुमारे ५० लाख रुपयांची मोठी बचत होणार आहे. प्रशासकीय दृष्टिकोनातून ही बचत अत्यंत मोलाची आहे. वाचलेला हा मोठा निधी आता शहराच्या इतर प्रलंबित विकासकामांसाठी, जसे की नवीन रस्ते बांधणी, सांडपाणी व्यवस्थापन आणि सार्वजनिक उद्यानांच्या नूतनीकरणासाठी वापरण्याची सुवर्णसंधी पालिकेला मिळणार आहे. पर्यावरण रक्षणाचा प्रभावी संदेश: सौर ऊर्जेच्या वापरामुळे कोळशावर आधारित विजेवरील अवलंबित्व कमी होईल, परिणामी कार्बन उत्सर्जनात मोठी घट होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि नैसर्गिक संसाधने यांचा प्रभावी मेळ घालून पर्यावरण संरक्षणास मदत करणे, ही काळाची गरज असल्याचे या प्रकल्पातून सासवड पालिकेने सिद्ध केले आहे. या उपक्रमामुळे पालिकेवरील आर्थिक बोजा कमी होऊन शहराच्या विकासाला अधिक गती मिळणार आहे.

**प्रतिक्रिया ''सासवड शहराला प्रगत आणि स्वयंपूर्ण बनवण्यासाठी आम्ही तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर दिला आहे. पाणीपुरवठा केंद्रावर ६५० किलोवॅटचा ट्रान्सफॉर्मर बसवल्याने सौर प्रकल्पाचा पूर्ण लाभ आता शहराला मिळणार आहे. यामुळे वाचणारा ५० लाखांचा निधी हा सासवडकरांच्या हक्काचा पैसा असून, तो आम्ही शहराच्या सुशोभीकरणासाठी खर्च करू. सासवडच्या प्रगतीचा हा नवा आलेख आहे.'' श्रीमती.आनंदी चंद्रकांत जगताप (लोकनियुक्त नगराध्यक्षा, सासवड नगरपरिषद)**

भविष्यातील परिणाम: या प्रकल्पामुळे सासवड नगरपालिका आता वीज निर्मितीत स्वावलंबी होण्याच्या मार्गावर आहे. सौर ऊर्जेचा असा प्रभावी वापर राज्यातील इतर स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी एक उत्तम 'रोलमॉडेल' ठरणार आहे.



**फोटोओळ:सासवड नगरपालिकेच्या पाणीपुरवठा केंद्रावर ६५० किलोवॅट क्षमतेचा नवीन ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करताना लोकनियुक्त नगराध्यक्षा श्रीमती आनंदी चंद्रकांत जगताप आणि इतर मान्यवर.**

# पुरंदरच्या शैक्षणिक क्षितिजावर कोथळेची सुवर्णझेप विद्या महामंडळ प्रशालेचा सलग १०० टक्के निकाल!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुरंदर :** ग्रामीण भागातील गुणवत्ता आणि जिद्दीच्या जोरावर श्री मल्हार शिक्षण मंडळ, कोथळे संचलित विद्या महामंडळ प्रशालेने दहावीच्या निकालात आपले वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. प्रशालेने यंदाच्या एस.एस.सी.

**मुख्याध्यापकांच्या नियोजनाने रचला यशाचा महामेरू ; ८१ विद्यार्थी उत्तीर्ण**

परीक्षेत १०० टक्के निकालाची नोंद करत यशाचे शिखर गाठले असून, या दैदिप्यमान यशाने संपूर्ण पुरंदर तालुक्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. नियोजनबद्ध अभ्यासाने यशाला गवसणी प्रशालेचे मुख्याध्यापक प्रशांत कदम यांच्या




कुशल मार्गदर्शनाखाली ८१ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी विशेष तयारी केली होती. प्रविष्ट झालेले सर्व ८१ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने कोथळे पंचक्रोशीत आनंदाचे वातावरण आहे.

**गुणवत्तेत झळकलेल्या विद्यार्थिनी:**
१. प्रगती रमाकांत जगताप (९२.४०%) – प्रशालेत प्रथम
२. वैष्णवी परसराम झगडे (९०.००%) – प्रशालेत द्वितीय
३. वैष्णवी शरद भोसले (८९.६०%) – प्रशालेत तृतीय

संस्था व संचालक मंडळाचे खंबीर पाठबळ श्री मल्हार शिक्षण मंडळ, कोथळे या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली प्रशालेने शैक्षणिक क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. संस्थेचे अध्यक्ष विजय विलास जगताप, उपाध्यक्ष पोपट भोसले, सचिव विजय संपत जगताप, कोषाध्यक्ष तुषार लालासो खैरे आणि सहसचिव राजेंद्र महादेव जगताप यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचा आमचा संकल्प या निकालामुळे अधिक दृढ झाला असल्याचे संचालक मंडळाने नमूद केले.

यशाचे खरे शिल्पकार: शिक्षक व कर्मचारी वृंद विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्यामध्ये मुख्याध्यापक प्रशांत कदम यांच्यासह शिक्षक टीमने रात्रंदिवस मेहनत घेतली. यामध्ये संजय केशवराव घोगरे, किशोर प्रभाकर भालेराव, सुनील किसन अंजारकर, धोंडीराम पांडुरंग पवार, कैलास बाळासाहेब भोसले, अशोक नंदराज साबळे आणि धनंजय पवार या शिक्षकांनी विषयानुसार सखोल मार्गदर्शन केले.

तसेच राणे मॅडम, शेळके मॅडम, हांडे मॅडम आणि जगताप मॅडम यांनीही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विशेष परिश्रम घेतले. प्रशालेच्या प्रशासकीय कामात लेखनिक रामचंद्र ज्ञानोबा भोसले यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

**''शाळेचा १०० टक्के निकाल लागणे ही आमचे शिक्षक, संचालक मंडळ, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी केलेल्या सामूहिक कष्टांची पावती आहे. श्री मल्हार शिक्षण मंडळाचे सहकार्य आणि मार्गदर्शनामुळेच आम्ही हे यश साध्य करू शकलो.'' ` प्रशांत कदम, मुख्याध्यापक**

या ऐतिहासिक यशाबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, लेखनिक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

## जुन्नर तालुक्याला तहसीलदारच नाही

### शेळकेंच्या बदलीनंतर पद रिक्त, अतिरिक्त कारभार शीरसाठ यांच्याकडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** तत्कालीन तहसीलदार डॉ. सुनील शेळके यांची बदली झाल्यापासून जुन्नर तहसील कार्यालयाचे तहसीलदार पद रिक्त आहे. सध्या या पदाचा अतिरिक्त कार्यभार बाळासाहेब शीरसाठ यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. डॉ. सुनील शेळके यांच्या कार्यकाळात ई–फेरफार, ई–हक्क, ॲग्रीस्टॅक, पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करणे या शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांची जुन्नर तालुक्यात प्रभावी अंमलबजावणी झाली होती. त्यांच्या कामाची दखल घेत पुणे जिल्ह्यातील उत्कृष्ट तहसीलदार म्हणून त्यांचा गौरवही करण्यात आला होता.

मात्र, त्यांची बदली झाल्यानंतर गेल्या काही काळापासून जुन्नरला पूर्णवेळ तहसीलदारच नाही. अतिरिक्त कार्यभारामुळे दैनंदिन कामकाजावर परिणाम होत असून नागरिकांना दाखले, ७/१२ उतारे, फेरफार नोंदी, संजय गांधी निराधार योजना, शेतकरीविषयक कामांसाठी खोळंबा सहन करावा लागत आहे त्याच बरोबर नायब तहसीलदार पदे देखील रिक्त असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. जुन्नर हा भौगोलिकदृष्ट्या पुणे जिल्ह्यातील सर्वात मोठा तालुका असून आदिवासी व डोंगरी भाग मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे येथे पूर्णवेळ तहसीलदार असणे अत्यंत आवश्यक आहे, अशी मागणी नागरिक व शेतकऱ्यांतून होत आहे. रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# काकणेवाडीत गाळमुक्त धरण, शिवार योजनेचा शुभारंभ

## आ. दातेंच्या हस्ते कामास सुरुवात



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील काकणेवाडी येथे आज महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत कामाचा शुभारंभ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आ. काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. जलसंधारण, शेती विकास आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा लाभ होणार आहे.

याप्रसंगी प्रदिप वाळुंज, सरपंच गिताराम वाळुंज, जयवंतशेठ वाळुंज, भास्कर वाळुंज सर, ज्ञानदेव वाळुंज, दगडु वाळुंज, बाळासाहेब वाळुंज, संदीप वाळुंज, मधुकर झावरे, मारुती वाळुंज, संपत वाळुंज, भाऊसाहेब वाळुंज, सोन्याबापु वाळुंज, ओंकार पुरी, प्रणव वाळुंज, भगवान वाळुंज, दत्तात्रय किसन वाळुंज, सुभाष वाळुंज, रविंद्र वाळुंज, लक्ष्मण वाळुंज,सुनिल वाळुंज, नामदेव वाळुंज, मंगेश वाळुंज, पोपट वाळुंज आदीसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या योजनेअंतर्गत धरणांमध्ये वर्षानुवर्षे साचलेला गाळ बाहेर काढून तो शेतकऱ्यांना शेतीसाठी उपलब्ध करून दिला जातो. त्यामुळे धरणांची पाणी साठवण क्षमता वाढण्यास मदत होते, तर दुसरीकडे गाळामुळे जमिनीची सुपीकता वाढून शेती उत्पादनातही भरघोस वाढ होते. नैसर्गिक पोषक घटकांनी युक्त असलेला हा गाळ पिकांसाठी नैसर्गिक खताचे काम करत असल्याने रासायनिक खतांवरील खर्चातही मोठी बचत होणार आहे.

यावेळी बोलताना आ. काशिनाथ दाते सर म्हणाले की, पाणी हा भविष्यातील सर्वात मोठा प्रश्न असून जलसंधारण ही काळाची गरज आहे. गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार योजना ही केवळ धरण स्वच्छ करण्याची मोहीम नसून शेतकऱ्यांच्या समृद्धीचा आणि शाश्वत शेतीचा मार्ग आहे. धरणातील गाळ शेतात गेल्याने जमिनीची उत्पादकता वाढते, तर धरणात अधिक पाणीसाठा उपलब्ध होऊन भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यास मदत होते. शासनाच्या अशा लोकहिताच्या योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत.

तसेच त्यांनी शेतकऱ्यांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले. जलसंधारणाच्या कामात लोकसहभाग आवश्यक असल्याचेही नमूद करून आजची पाण्याची बचत ही उद्याच्या पिढीसाठीची मोठी गुंतवणूक आहे. गावागावात जलसंवर्धनाची चळवळ उभी राहिली तरच भविष्यातील पाणीप्रश्नांवर कायमस्वरूपी उपाय होऊ शकतो,असेही ते म्हणाले.

मृद व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणारी ही योजना राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये प्रभावीपणे सुरू असून, धरणांची साठवण क्षमता वाढवणे आणि शेतकऱ्यांच्या जमिनीचा दर्जा उंचावणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

# रामेश्वरदासजी विद्यालयाचे यश



**हातगाव :** जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहीगाव - ने संचालित शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील श्री रामेश्वरदासजी विद्यालयाचा इयत्ता १० वी चा निकाल नुकताच जाहीर झाला आहे .७० . १७ टक्के लागलेल्या या निकालात मुलींनीच बाजी मारली असून आई- वडील मयत असलेल्या एका विद्यार्थ्याने परीक्षेमध्ये प्रत्येक विषयात ३५ गुण प्राप्त करत यशस्वी होण्याचा मान मिळवला आहे. अशी माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक गोरक्ष सातपुते यांनी दिली आहे.

ते म्हणाले की, विद्यालयाचा इयत्ता १० वी चा जाहीर झाला असून वर्षा कचरू मडके हिने ८३.४० टक्के गुण मिळऊन विद्यालयात प्रथम ,गौरी गणेश वैद्य हिने ८०.४० टक्के मिळऊन द्वितीय, सुहाना शामद शेख हिने ७६.६० टक्के टक्के मिळउन तृतीय, श्रावणी नागेश अभंग हिने ७०.२०टक्के मिळवून चतुर्थ तर तनुश्री सुभाष भालेराव हिने ७० टक्के गुण मिळवत पाचवा क्रमांक मिळवला आहे . व ऋषिकेश कारभारी नरवडे या विद्यार्थ्याने आई-वडील मयत झाले असून वर्षभर शाळेच्या वेळेच्या व्यतिरिक्त इतर कामे करून त्याने प्रत्येक विषयात ३५ गुण मिळवले असल्याने यशस्वी ५ मुलीसह त्याचाही विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला असल्याचेही सातपुते यांनी सांगितले. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी आ. नरेंद्र घुले पाटील,सचिव चंद्रशेखर घुले पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.राजश्रीताई घुले, प. स. चे माजी सभापती क्षितिजभैय्या घुले पाटील,प्रशासकीय अधिकारी के वाय नजन, समन्वयक विजय काशिद, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शिवाजीराव पाटील, माजी उपसरपंच राजेंद्र पाटील यांचेसह ग्रामस्थांतून अभिनंदन होत आहे. या वेळी पत्रकार रावसाहेब निकाळजे, वर्गशिक्षक बाळासाहेब कोकरे, सतीश सुपारे,राहुल ज्योतिक धनंजय वैद्य, सुनील म्हस्के,अशोक पवार, अक्षय मरकड,राजू मिसाळ यांचेसह पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# लख्ख चंद्रप्रकाश... शांत जंगल अन् वन्यजीवांचा थरारक 'नाईट शो' !

## विविध पशुपक्षांबरोबर वन्यप्राण्यांचा मुक्त संचार ; पाहणीत उलगडले जंगलातील रहस्य

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका : बुद्ध पौर्णिमेच्या लख्ख चंद्रप्रकाशात दरवर्षी वन विभागाच्या वतीने जंगलातील पशुपक्षी तसेच प्राण्यांची गणना, निरीक्षण करण्यात येत असते. चालू वर्षी १ मे रोजी केलेल्या निरीक्षणामध्ये तालुक्यात सर्वाधिक रानडुकरांची संख्या आढळून आली. हरीण, काळवीट, खोकड, मोर, ससा, लांडगा, कोल्हा, उदमांजर, रानमांजर, साळींदार, मोर तसेच विविध जातींच्या पक्षांचा मुक्त संचार पाहावयास मिळाला. साप, घोरपड, शामिलियन सरडा याचबरोबर सरपटणारे विविध जीव वनविभागाचा निदर्शनास आले.**

तालुक्यात सुमारे साडेसहा हजार हेक्टर वनक्षेत्र आहे. तसेच आर्मीचेही मोठे क्षेत्र आढळून येते. खासगी मालकीच्या डोंगररांगा देखील मोठ्या प्रमाणात आहेत. तालुक्यात मोठ्या प्रमाणात गर्भगिरीच्या डोंगररांगांचे अस्तित्वा आढळून येते.

> वन्य प्राण्यांच्या संरक्षणासाठी नागरिकांनीही काळजी घेण्याची गरज आहे. शेतकऱ्यांनी डोंगराच्या कडेला आपले बांध जाळु नयेत. तसेच वन विभागाच्या हद्दीमध्ये धूम्रपान करू नये. वनव्यामुळे वनसंपदेचे तसेच वन्य प्राण्यांचे मोठे नुकसान होत असते. गावो गावी वनवा विरोधी पथक तयार करणे गरजेचे आहे.
>
> **मनेष जाधव**
> **(वनरक्षक, जेऊर )**

या डोंगर रांगांमध्ये लपन व सहज उपलब्ध होणारे अन्न यामुळे वन्य प्राण्यांचा वावर मोठ्या प्रमाणात आढळून येत असतो. यापूर्वी अनेक वेळा या परिसरात बिबट्याचाही वावर आढळून आलेला आहे.

बुद्ध पौर्णिमेचा चंद्र प्रकाश सर्वात जास्त उजेड देणारा प्रकाश असतो. त्यामुळे वनविभागाच्या वतीने जंगलामध्ये पानवठा तसेच वन्य प्राण्यांचा, पक्षांचा वावर असेल अशी ठिकाणी निवडून निरीक्षण करण्यात येत असते. तालुक्यातील सर्व मंडळामध्ये करण्यात आलेल्या निरीक्षणातून रानडुकरांची संख्या सर्वाधिक असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याचबरोबर इतर विविध जातींच्या पक्षांचाही वावर आढळून आला. प्राण्यांचा मुक्त संचार पाहावयास मिळाला.

वन विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वन्यप्राणी निरीक्षण मोहिमेत अनेक दुर्मिळ तसेच नियमित आढळणाऱ्या वन्यजीवांचे दर्शन घडले. रुपेरी चांदण्यांचा प्रकाशात जंगलातील प्रत्येक हालचाल टिपताना वनाधिकारी व निसर्गप्रेमींना वेगळाच रोमांच अनुभवायला मिळाला. चंद्राच्या नैसर्गिक प्रकाशामुळे प्राणी अधिक सहजपणे निरीक्षणात आल्याचे वनअधिकारी व कर्मचाऱ्यांनी सांगितले. वनविभागाच्या या उपक्रमामुळे जंगलातील जैवविविधतेचा अभ्यास करण्यास मदत होत असून वन्यजीव संरक्षणाबाबत जनजागृती होत आहे.



> तालुका निसर्ग संपदेने नटलेला आहे. मोठ्या प्रमाणात असलेल्या डोंगररांगा वन्य प्राण्यांना आकर्षित करत असतात. त्यामुळे जंगलामध्ये वन्यप्राण्यांचा व पशुपक्ष्यांचा मोठ्या प्रमाणात मुक्त संचार आढळतो. वन्य प्राण्यांच्या संरक्षणासाठी जंगलातील मानवाचा हस्तक्षेप कमी होणे गरजेचे आहे.
>
> **अविनाश तेलोरे**
> **(वनपरिक्षेत्र अधिकारी वनविभाग )**

# साखरपुड्याला जाताना पाच पांडवांची रंगली पार्टी.. 'मोरक्या'च्या सावलीत नगर परिषदेत तणाव !

दादा सोनवने । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा नगरपरिषदेतील एका माजी नगरसेवकांच्या मुलीच्या नाशिक येथील साखरपुड्यासाठी श्रीगोंदयातून काही मान्यवर रवाना झाले होते. प्रवासादरम्यान आळेफाटा येथील एका हॉटेलमध्ये मद्यपानासाठी थांबलेल्या या मंडळींमध्ये सफाई कामगारांच्या आंदोलनाचा विषय निघाला आणि त्यातून वादाची ठिणगी पडली.

श्रीगोंदा नगरपरिषदेच्या माजी नगरसेवकाच्या मुलीचा साखरपुडा नाशिक ला असल्याने त्यांनी सर्वांनी एकाच गाडीत जायचे ठरवले. मात्र त्यावर एक खाजगी चालक घेतला. गाडी आळेफाटा जवळ आल्यावर स्वतःला मॅनेजिंग



डायरेक्टर समजल्या जाणाऱ्या नगरसेवकाच्या तोंडाला पाणी सुटले आणि गाडी एका आलिशान हॉटेल समोर थांबली आणि मग सुरू झाली सोमरस पार्टी. पार्टीत चर्चेदरम्यान काही जणांची सफाई कामगार यांच्याबाबतीत जीभ घसरल्याने महिला आणि मागासवर्गीय समाजाबाबत कथित आक्षेपार्ह व अपमानास्पद वक्तव्य करण्यात आल्याचा आरोप आहे.

ही बाब संबंधित मागासवर्गीय वाहन चालकाच्या लक्षात आल्यानंतर त्याने यावर तीव्र आक्षेप घेतला. एवढेच नव्हे, तर दरबारात मोरक्या मोठा असला, तरी लगाम सारथ्याच्याच हातात असतो, हे दाखवत चालकाने त्यांना हॉटेलमध्येच सोडून श्रीगोंद्याची वाट धरल्याचे समजते.

शहरात चर्चा अशीही रंगली की, या संपूर्ण प्रकरणात एका 'मोरक्या'ची छाया सर्वत्र जाणवत होती. नाव कुणी घेत नाही, पण इशारा मात्र साऱ्यांना समजतोय. दरम्यान, श्रीगोंद्यात परतल्यानंतर चालकाने घडलेला प्रकार इतर कामगारांना सांगितल्याने शनिवारी नगरपरिषदेत वातावरण चांगलेच तापले. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी या घटनेचा निषेध करत कामावर बहिष्कार टाकल्याने प्रशासनाची मोठी कोंडी झाली. प्रशासनाने दिवसभर तणाव निवळण्यासाठी प्रयत्न केले, मात्र उशिरापर्यंत तोडगा निघू शकला नसल्याचे समजते. एका खासगी कार्यक्रमासाठी निघालेली पाच पांडवांची पार्टी, आता मोरक्यासह नगरपरिषदेसाठी राजकीय डोकेदुखी ठरल्याची चर्चा शहरभर सुरू आहे.

# देवदैठण विद्याधाममध्ये निकालात मुलींची बाजी !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेतील मुलींनी इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत गुणवत्तेत बाजी मारली आहे.

प्रशालेचा इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी १६९ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी १६१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. निकाल ९५.२६ टक्के इतका लागला असून सर्वप्रथम येण्याचा मान हितेश्री सुनिल सिनारे हिने ९४.२० टक्के गुण मिळवत पटकावला .साक्षी रोहिदास वाघमारे हिने ९२.४० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक तर आर्या सुधीर मेंगवडे हीने ९१.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला.

इयत्ता बारावी परीक्षेचा निकाल ७९.१६ टक्के लागला असून यामध्ये दिव्या गायकवाड हिने ७६.३३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला, तर श्रुती जगताप हिने ६४ टक्के गुण मिळवत द्वितीय तर पुनम करंजुले हिने ६३.३३ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर, सचिव नंदकुमार निकम, शाळा समिती अध्यक्ष चंदुलाल चोरडिया,माजी मुख्याध्यापक विशाल डोके ,मुख्याध्यापक नामदेव डुंबरे व ग्रामस्थांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# १३ मे ला कर्जत नगराध्यक्ष पदाबाबत विशेष सभा

## प्रांताधिकारी नितीन पाटील बैठकीचे पीठासन अधिकारी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** कर्जत नगरपंचायतीच्या गटनेता बदलानंतर गुरुवारी तात्काळ १३ नगरसेवकांनी कर्जतच्या विद्यमान नगराध्यक्षा रोहिणी सचिन घुले यांच्यावर देखील अविश्वास ठराव दाखल करीत त्यांना पदावरून दूर करण्याची मागणी जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांच्याकडे केली. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी आशिया यांनी या संबंधी बुधवार, दि १३ मे रोजी विशेष सभा कर्जत नगरपंचायतीच्या सभागृहात आयोजित केली आहे. कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील यांची पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा कर्जत नगरपंचायतीमध्ये पदाधिकारी बदलाचे वारे जोरदार वाहू लागले. सव्वा चार वर्षात कर्जत नगरपंचायतीमध्ये एकाच गटात असणाऱ्या १५ नगरसेवकांमध्ये धुसफूस चांगलीच वाढली आहे.

कर्जत नगरपंचायतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्या १५ नगरसेवकांचा एक गट स्थापन करण्यात आला. सव्वा तीन वर्षांत पदाधिकारी निवडीच्या महत्वकांक्षेत याच १५ नगरसेवकांमध्ये असंतोष उफाळला. ११ नगरसेवकांनी वेगळी चूल मांडत भाजपाशी हातमिळवणी करीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उषा अक्षय राऊत यांच्यावर अविश्वास दाखवत सत्तांतर घडवले. यात तत्कालीन काँग्रेसच्या उपनगराध्यक्षा रोहिणी सचिन घुले यांना भाजपाने संधी देत उर्वरीत काळासाठी सर्वसाधारण महिला दोन नगराध्यक्षा फॉर्म्युला ठरवत विराजमान केले. नगराध्यक्षा निवडीनंतर रोहिणी घुले यांच्यासह बंडखोरी करणारे ११ नगरसेवकांनी भाजपात प्रवेश करीत भाजपामय झाले. दहाच महिन्यात पुन्हा पदाधिकारी बदलावरून याच ११ नगरसेवकांमध्ये पुन्हा धुसफूस सुरू झाली. त्याची प्रचिती उपगटनेत्याने चक्क गटनेताच बहुमताने पदावरून दूर करीत आपले नाव गटनेत्या पदावर कोरले. विशेष म्हणजे या गटनेत्या निवडीत विरोधी असणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे ४ नगरसेवक यांनी भाजपाच्या गटास मदत केली. आणि उषा राऊत यांच्या पायउताराचा बदला घेतला.

गटनेत्या बदलावरच कर्जत नगरपंचायतीचे राजकारण न थांबता त्यांनी तात्काळ दुसरा अध्याय सुरू करीत विद्यमान नगराध्यक्षा रोहिणी सचिन घुले यांच्यावर १५ पैकी गटातील ११ नगरसेवक आणि भाजपाचे २ नगरसेवक यांना सोबत घेत एकूण १७ पैकी १३ नगरसेवकांनी अविश्वास ठराव दाखल करीत त्यांना कर्जत नगराध्यक्षा पदावरून दूर करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी आपल्या प्राप्त अधिकारानुसार १० दिवसांच्या आत विशेष सभा आयोजित करणे बंधनकारक असल्याने दि १३ मे रोजी सकाळी ११ वा. नगराध्यक्षा रोहिणी घुले यांच्यावरील अविश्वास ठराव मागणी पत्रानुसार बोलावली असून या बैठकीसाठी पीठासीन अधिकारी म्हणून कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील यांची नियुक्ती केली असल्याचे आदेश पत्र जारी केले आहे.

> **राजकीय अस्तित्व, पदाचा बदला आणि शब्दाची पूर्ती !**
>
> मागील वर्षी उषा राऊत यांच्याविरुद्ध ११ नगरसेवकांनी बंडखोरी करीत त्यांना पदावरून दूर केले होते. तदनंतर अवघ्या दहाच महिन्यात याच ११ नगरसेवकांत असंतोष उफाळला आणि त्यांनी राष्ट्रवादी गटाच्या ४ नगरसेवकांसोबत घेत गटनेता बदलत नगराध्यक्षा रोहिणी घुलेंवर अविश्वास मांडला. १३ मे च्या निर्णयाकडे स्थानिक राजकीय पदाधिकाऱ्यांचे डोळे लागले असताना कर्जतच्या राजकारणात पदाचा बदला पदानेच काढला जातो काय ? यावर पैंजा झडू लागल्या आहेत. तसेच राम शिंदे यांच्या राजकीय फॉर्म्युलाप्रमाणेच निवडी होतात का ? याकडे देखील लक्ष लागले आहे.

# दखल

### लिटिल वंडर्स स्कूलची शंभर टक्के निकालाची परंपरा

**नगर तालुका :** नगर तालुक्यातील जेऊर येथील शांतिनिकेतन फाउंडेशनचे लिटिल वंडर्स स्कूल व विजडम हायस्कूल शाळेच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेमध्ये सलग बाराव्या वर्षी १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. शाळेची विद्यार्थिनी सायली संजय वाघ (८७.२०टक्के) गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. जिज्ञासा अमोल वाघ (८१.२० टक्के) द्वितीय तर पायल कानिफनाथ शिकारे (८० टक्के ) गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देऊन अभ्यास करून घेतला जात असल्याने सलग बारा वर्षे १०० टक्के निकालाची परंपरा शाळेने कायम राखली असल्याचे शाळेच्या संचालिका स्वाती चेमटे यांनी सांगितले. यशस्वी विद्यार्थ्यांना शिक्षिका कल्पना वड्डेपल्ली, आयेशा सय्यद, मुख्याध्यापिका श्रीमती चंद्रमौळी श्री धात्री यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

### काकडे विद्यालयाचा एस.एस.सी. परीक्षेत ८६.९२% निकाल

**एरंडगाव :** माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात आलेल्या सन २०२५-२०२६ च्या एस.एस.सी. (इयत्ता १० वी) परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. शेवगाव येथील कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे आबासाहेब काकडे विद्यालयाने आपल्या यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ८६.९२% लागला असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयातून एकूण ४१३ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यापैकी ३५९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ८०विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य प्राप्त केले तर ९७विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. सेमी-इंग्रजी माध्यम: प्रथम क्रमांक कु. देशमुख श्रेया वसंत (९६.८०%) द्वितीय क्रमांक कु. गरड श्रुती ज्ञानेश्वर (९३.००%) तृतीय क्रमांक चि. खेडकर श्रीकृष्ण दत्तात्रय (९१.६०%) मराठी माध्यम: प्रथम क्रमांक चि. ढाकणे तुषार अजिनाथ (७८.८०%)द्वितीय क्रमांक कु. गिरगे दिव्या दत्तात्रय (७४.००%)तृतीय क्रमांक कु. इंगळे प्रांजल अरुण (६६.४०%) या यशाबद्दल कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष डॉ. श्री.विद्याधरजी काकडे साहेब,.जि.प.सदस्य सौ.हर्षदाताई काकडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.डॉ.श्री.लक्ष्मणराव बिटाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.पृथ्वीसिंहभैया काकडे, शिक्षण विभाग प्रमुख श्रीम.वंदना पुजारी, शिक्षण विभाग सहप्रमुख अशोक आहेर, विद्यालयाचे प्राचार्य. संपतराव दसपुते सर, पर्यवेक्षक .सुनिल आव्हाड,लक्ष्मणजी गाडे व अविनाश भागवत यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### डॉ. राजेंद्रप्रसाद विद्यालयाचा दहावीचा निकाल ९५.८३%

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील पारगाव सुद्रिक येथील डॉ राजेंद्र प्रसाद विद्यालयाच्या एसएससी मार्च २०२६ रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल ९५.८३% लागला असून या विद्यालयाचे गुणवत्तेत आलेले पहिले पाच विद्यार्थी पुढील प्रमाणे आल्हाट समीक्षा ८५.४०% ,कुलांगे संस्कृती ८१ टक्के , खेतमाळीस, ज्ञानेश्वरी ८०.%, थोरात असीमता ७९.८०% ,खेतमाळीस अनुष्का ७९.८०% हे विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले आहेत. या यशस्वी विद्यार्थ्यांचे छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे, जिल्हा बँकेच्या संचालिका अनुराधाताई नागवडे कारखान्याचे उपाध्यक्ष सौ मेघा औटी सर्व विश्वस्त मंडळ, संस्थेचे निरीक्षक सचिनराव लगड, स्कूल कमिटीचे अध्यक्ष व सर्व सदस्य मुख्याध्यापिका श्रीमती अनिता काळे व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

### भातकुडगाव विद्यालयाचा ९८.४३% निकाल

**ढोरजळगांव :** भातकुडगाव माध्य उच्च माध्य विद्यालयाचा इयत्ता १० वी चा निकाल ९८.४३% लागला. त्यामध्ये कु. गौरी भालेराव ९२.००% प्रथम, चि. अनिकेत फटांगरे ८८.६०% व्दितीय, कु. स्नेहल आहेर ८५.६०% तृतीय, चि. यशराज फटांगरे ८४.८०% चतुर्थ, वैष्णवी घुमरे ८२.६०% पाचवा क्रमांक मिळवला असुन या विद्यार्थ्यांनी आणि विद्यार्थीनींनी यशाची उज्ज्वल परंपरा कायम ठेवली आहे. या गुणवंत विद्यार्थाचे आ. डॉ. नरेंद्रजी घुले, आ.चंद्रशेखर घुले, राजश्री घुले, सभापती डॉ क्षितिज घुले, प्रशासकीय अधिकारी के वाय नजन , समन्वयक विजय काशिद,विद्यालयाचे प्राचार्य सुरेश शेरे ,वर्गशिक्षक एम एस भालेराव यांनी अभिनंदन केले आहे.

### जय मल्हार विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**अहिल्यानगर :** पिंपळगाव रोठा (ता. पारनेर) येथील जय मल्हार विद्यालयाचा १० वी बोर्ड मार्च २०२६ परीक्षेचा निकाल ९५.८३%टक्के लागला असून विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. मार्च २०२६ च्या बॅचमध्ये विद्यालयातील २५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.विद्यालयाचा शेकडा निकाल ९५.८३% टक्के लागला आहे. प्रथम येणारे पाच विद्यार्थी असे : प्रथम वनिजा शिवाजी उमाप ८७.६० %,द्वितीय प्रिया बाळु माकरे ८१.६०%,तृतीय प्रांजल भाऊसाहेब जगदाळे ८१.०० %,चतुर्थ आदित्य अशोक सुपेकर ७८.६०%,पाचवी कांचन सुरेश मुंढे ७८.४०% संस्थेचे सचिव ड.पांडुरंग गायकवाड, विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम सुंबरे यांनी शाळेने उत्कृष्ट निकालाची परंपरा राखल्यामुळे समाधान व्यक्त केले आहे. हे विद्यालय पूर्णपणे सेमी इंग्रजी असून या विद्यालयात ग्रामीण भागातील गोर गरीब, शेतकरी, शेतमजूर मुला-मुलींना दर्जे दार शिक्षण दिले जाते. विद्यालयातील या विद्यार्थ्यांना शिक्षक बी.आर उंडे ,जरांगे एन.बी.,गरकळ बी एस ,केदारी एन. बी यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन लाभले आहे. तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सुद्धा सहकार्य मिळाले.परिसरातील ग्रामस्थ,पालक, हितचिंतक,माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी विद्यालयाच्या या निकालाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### महेश मुनोत विद्यालयाचा निकाल ९४.०४ टक्के

**नगर तालुका :** तालुक्यातील वांबोरी येथील अ. ए. सोसाएटीच्या महेश मुनोत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता १० वी चा निकाल ९४.०४टक्के लागला. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अ. ए. सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, शाला समितीचे चेअरमन हेमंत मुथा, प्रशालेच्या प्राचार्या शुभांगी देशपांडे,उपप्राचार्य बेलदार,पर्यवेक्षक निलेश भालेराव यांनी अभिनंदन केले .२३५ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते.सुमारे ३९ विद्यार्थ्यांना ७५% पेक्षा जास्त गुण मिळाले.शासनाच्या कॉपीमुक्त अभियानास शाळेने प्रतिसाद देत विद्यार्थ्यांनी चांगले यश मिळवले.कु.सत्रे श्रावणी हिने ४७१ गुण मिळवून तिला ९४.२० टक्के विद्यालयात प्रथम आली.कु.पुंड शितल हिने ९२.८० इतके गुण घेऊन ती प्रशालेत दूसरी आली तर कु. गाढे सुप्रिया हिस ९१.४० टक्के गुण मिळाले व ती प्रशालेत तिसरी आली.अनेक विद्यार्थ्यांनी विविध विषयांत उत्तम गुण संपादन केले. प्रशालेतील शिक्षकांचे व पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

# टाकळीभान उपबाजार आवारात मोकळा कांदा लिलावास सुरुवात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्याच्या पूर्व भागातील मुख्य बाजारपेठेचे गाव असलेले व कृषी उत्पन्न समितीचे उपबाजार आवर केंद्र असलेले टाकळीभान येथे शेतकऱ्यांच्या मोकळा कांदा लिलावास शनिवार दि.९ मे पासून सुरुवात झाली असून मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी आपला कांदा टाकळीभान उपबाजार येथे विक्रीसाठी आणला होता. मोकळा कांदा लिलावास बऱ्यापैकी भाव मिळत असल्याने यावेळी कांदा वाहतूक करणाऱ्या वाहनांची मार्केटच्या रस्त्यावर गर्दी झाली होती.



# कॅप्टन खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

## नाशिक कारागृहात हलवले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : गेल्या सहा दिवसांपासून शिर्डी पोलीसांचा पाहूणचार घेत असलेला आरोपी कॅप्टन खरात ची अखेर पोलीस कोठडी संपली असून राहाता न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे . सुरक्षेच्य दृष्टने त्यास नाशिक कारगृहात हलवण्यात आले आहे. ४ मे रोजी खरात ची वरात शिर्डीत आणली होती .

शिर्डीतील चार एकर जमीन फसवणूकीच्या गुन्ह्यात त्यास पाच दिवस पोलीस कोठडी देण्यात आली होती. त्याने या जमीनीच्या व्यवहारा बाबत जास्त काही माहिती न देता सदर व्यवहार कायदेशीर असून त्या व्यवहारात असेलल्या साक्षिदारांनी मला फसवले असल्याची कबूली दिली होती त्यानुसार शिर्डी पोलीसांनी त्या व्यवहारात असलेले साक्षिदार भाऊसाहेब चौधरी , सचिन वाणी व प्रभाकर गुंजाळ व फसवणूक झालेला जमीन मालक रावसाहेब गोंदकर यांना चौकशी कामी



बोलावून कॅप्टन खरात समोर सुनावणी झाली असता खरात ने तुम्हीच मला फसवले असा आरोप करत एकमेकांत तू तू मैं मैं झाले होते.

त्यांनंतर पोलीसांनी वरील तिघांचा जबाब नोंदवला आहे. काल खरातला राहाता न्यायालयात हजर केले असता पोलीसांनी खरात हा तपासात सहकार्य करत नाही तसेच त्याची आरोपी पत्नी कल्पना ही फरार असून तिला अटक करणे बाकी असल्याचे कोर्टाच्या निर्देशनास आणून दिले असता कोर्टाने त्यास न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

# बेलापूर परिसराला अवैध धंद्यांचा विळखा !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : बेलापूर परिसरातील अनेक गावाना अवैध धंद्यांचे ग्रहण लागले आहे.त्यामुळे यातूनच गुन्हेगारी वाढत आहेत.सध्या अवैध धंद्येवाल्यांची चांगली चलती असल्याचे दिसून येत आहे.याकडे मात्र पोलिस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव, बेलापूर, एकलहरे, बेलापूर खुर्द, आदिसह गावात मोठ्या प्रमाणात अवैध धंदे चांगले तेजीत सुरू आहेत. विशेष म्हणजे महाराष्ट्रात गुटखाबंदी असताना मुद्देमाल मोठ्या प्रमाणावर विक्री केला जात आहेत.या परिसरात बेकायदा

### शासनाच्या वाळू साठ्यावर वाळू तस्करांचा ताबा ?

उक्कलगाव परिसरात वाळूतस्कर प्रवरानदीपात्रातून गाढव, बैलगाड्या, या सहाय्याने भरदिवसा वाळू वाहतूक करीत आहे. वाळूची साठवणूक करून अव्वाच्यासव्वा भावाने विक्री केली जाते. यावर कोणाचे नियंत्रण राहिले नाहीत असे दिसते.

दारूची विक्री राजरोसपणे सुरू आहेत. सध्या तरी खुलेआम मटका, जुगार जोमात सुरू आहेत. जर या धंद्यांविरुद्ध कुण्या सर्वसामान्य माणसाने आवाज उठवलाच तर, आमचा धंदा कोणी बंद करू शकत नाही, असा दमच अवैध धंदेवाले देतात. अशी परिसरातील परिस्थितीतील आणि ग्रामीण भागात अवैध धंदे जोमात सुरू आहेत. येथील कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याची धुरा पोलिसांची आहे.

मात्र सध्या या भागात अवैध व्यवसायांचा विळखा पडला आहे. यात कार्यक्षेत्रातील अनेक समाजसेवी संघटनांनी अवैध व्यवसाय बंद करण्यासाठी निवेदने, तक्रार अर्ज देतात. परंतु चार दिवस धंदे आदळ आपटीने बंद करून नौटंकी केली जाते. परंतु चार दिवसानंतर चित्र जैसे थे होताना दिसून येत आहे. अशी काहीशी स्थिती बनते.गुन्हे अन्वेषण विभाग अवैध धंदे बंद करण्याचे धाडस दाखवतील काय? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. या अवैध धंद्यांकडे जिल्हा पोलिस अधीक्षक याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे. याच परिसरात कल्याण -मुंबई मटका, जुगार अड्डे, अवैध दारू विक्री चालू आहे.या अवैध धंद्यांमुळे तरुण युवक वाममार्गाला लागत आहेत.तसेच पोलिस विभागाची प्रतिमा मलिन होताना दिसत आहे. मात्र, हप्ता दिला की,सगळं चालतं अशी काहिशी परिस्थिती ग्रामीण भागातील आहे.

# प्रवरा नदी पात्रात वाळू चोरट्यांचा धुमाकूळ

## एक आरोपी मुद्देमालासह पोलिसांच्या ताब्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील चिंचोली येथील प्रवरा नदीपात्रात वाळू चोरट्यांनी चांगलाच धुमाकूळ घातला. याची खबर पोलीस पथकाला लागताच पोलिस पथकाने मध्यरात्री दरम्यान वाळू तस्काराच्या मुसक्या आवळल्या. दोन वाळू तस्करांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून एक जणाला पोलिसांनी गजाआड केले आहे तर दुसरा फरार झाला. पोलीस पथकाकडून एक डंपर व एक ट्रॅक्टर जप्त करण्यात आला.

राहुरी तालुक्यातील चिंचोली येथील प्रवरा नदीपात्रात चोरटी वाळू वाहतूक सुरु आहे. अशी गुप्त खबर मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज आठरे, पोलिस उप निरीक्षक आशिष चौधरी, संजय विखे, हवालदार शिवाजी नन्हे



व देविदास कोकाटे आदि पोलिस पथकाने दि. ९ मे २०२६ रोजी मध्यरात्री १२.१५ वाजे दरम्यान चिंचोली येथील प्रवरा नदी पात्रात छापा टाकला.

त्या ठिकाणी काही इसम चोरटी वाळू वाहतूक करताना दिसून आले. तेव्हा पोलिस पथकाने एक ढंपर व एक ट्रॅक्टर असा २३ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दरम्यान एक जेसीबी चालक त्याच्या ताब्यातील जेसीबी घेऊन पळून गेला. तसेच ट्रॅक्टर वरील चालक देखील सदर ठिकाणावरून पसार झाला. पोलिस हवालदार देविदास कोकाटे यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात आरोपी सुनिल रमेश डेमरे, रा. आढाव वस्ती, खडकी रोड, ता. कोपरगाव, व दिपक गडाख, रा. पारेगाव, ता. संगमनेर, अशा दोन जणांवर गुन्हा रजि. नं. ४८१/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५, ३ प्रमाणे वाळू चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

दरम्यान पोलिस पथकाने सुनिल रमेश डेमरे याला ताब्यात घेऊन गजाआड केले. तर एकजण पसार झाला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

# जुन्नर येथून मोटारसायकल चोरी करणारे दोघे अटकेत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जुन्नर** : शहर व परिसरातून मोटारसायकल चोरी करणाऱ्या दोन युवकांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक करून त्यांच्या ताब्यातून सुमारे १ लाख १० हजार रुपये किमतीच्या दोन मोटारसायकली जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे परिसरातील वाहनचोरीच्या घटनांवर आळा बसण्यास मदत होणार आहे. जुन्नर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ८०/२०२६ भा.न्या. सं. कलम ३०३(२) अन्वये दाखल गुन्ह्यात दि. २९ मार्च २०२६ रोजी परीटवाडी (ता. जुन्नर) येथून शाईन कंपनीची मोटारसायकल चोरीला गेली होती. तसेच गु.र.नं. ११४/२०२६ अन्वये दि. २४ एप्रिल २०२६ रोजी जुन्नर शहरातून बुलेट मोटारसायकल चोरीस गेल्याची घटना घडली होती. या दोन्ही गुन्ह्यांचा स्थानिक गुन्हे शाखेमार्फत समांतर तपास सुरू असताना पोलिसांनी घटनास्थळ परिसरातील उउढत फुटेज तपासले. तपासादरम्यान दोन्ही चोरीच्या गाड्या ओतूरच्या दिशेने गेल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने ओतूर परिसरात गोपनीय माहितीदारांच्या मदतीने चौकशी सुरू केली. तपासात समर्थ बाळासाहेब ढगे (वय १८, रा. ५२ गल्ली, ओतूर, ता. जुन्नर) आणि अथर्व सचिन साबळे (वय २०, रा. ओतूर, ता. जुन्नर) हे दोघे विनानंबर प्लेटची शाईन मोटारसायकल वापरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. दि. ७ मे २०२६ रोजी हे दोघे कुमशेत फाटा, जुन्नर येथे येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचला. संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी दोन्ही मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली.

पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेल्या दोन्ही मोटारसायकली जप्त केल्या आहेत. आरोपींची वैद्यकीय तपासणी करून पुढील कार्यवाहीसाठी त्यांना जुन्नर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या पथकात पोलीस निरीक्षक किरण अवचर, सपोनि. महादेव शेलार, स.फौ. दिपक साबळे, पो.हवा. राजू मोमिन, पो.हवा. संदीप वारे, पोशी. अक्षय नवले आणि पोशी. अभिमन्यू मोटे यांनी सहभाग घेतला.

# व्यापाऱ्याला अडवून मारहाण २५ हजारांची लूट राहुरीतील ‘चाचा’ जाळ्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील सात्रळ येथे व्यापाऱ्याला अडवून मारहाण करत त्याच्याकडून जबरदस्तीने २५ हजार ४०० रुपयांची रोख रक्कम काढून घेतल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत या गुन्ह्यातील मुख्य आरोपीला जेरबंद केले आहे. राहुरी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक ३९१/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध गंभीर कलमान्वये हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीने दिलेल्या तक्रारीचा राग मनात धरून आरोपींनी बेकायदेशीर टोळी जमवून व्यापाऱ्याला जिवे मारण्याच्या उद्देशाने मारहाण केली आणि त्याच्याकडील रोख रक्कम बळजबरीने हिसकावून घेतल्याचा आरोप आहे. या घटनेतील आरोपींचा शोध घेत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त माहिती मिळाली की, या गुन्ह्यातील फरार आरोपी प्रशांत उर्फ चाचा रावसाहेब पलघडमल (वय ३२, रा. सात्रळ ता. राहुरी) हा निमगाव खुर्द ता. संगमनेर येथील अमरधाम परिसरात थांबला आहे.

या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने आपल्या साथीदारांसह हा गुन्हा केल्याची कबुली दिल्याची



माहिती पोलिसांनी दिली आहे. अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण कुमार कबाड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे यांच्या पथकाकडुन ही कारवाई करण्यात आली. तसेच या गुन्ह्याचा पुढील तपास राहुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# घोडेगावजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : नेवासा तालुक्यातील घोडेगाव परिसरात शुक्रवारी (दि.८ मे) सकाळी अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या अपघातात जितेश जानू चव्हाण (वय ३७, रा. मलकापूर, ता. पातूर, जि. अकोला) यांचा मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, जितेश चव्हाण हे आपल्या दुचाकीवरून छत्रपती संभाजीनगर येथून पुण्याकडे जात होते. सकाळी सुमारे अकराच्या सुमारास ते घोडेगाव (ता. नेवासा) परिसरात आले असता पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, ते रस्त्यावर कोसळले.

अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच सोनई पोलीस स्टेशनचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर जखमी अवस्थेत त्यांना उपचारासाठी नेवासा ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. या घटनेची खबर मृताचे नातेवाईक चरण जानू चव्हाण (वय ३४) यांनी सोनई पोलीस ठाण्यात दिली. त्यानुसार अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघातानंतर संबंधित वाहनचालक घटनास्थळावरून फरार झाला असून त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली आहेत.

परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच अन्य तांत्रिक बाबींची पडताळणी सुरू करण्यात आली आहे. सपोनि अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ एन. आर. तुपे व पोलीस कर्मचारी पुढील तपास करीत आहेत.

# बिबट्याच्या हल्ल्यात महिला जखमी; वाकडी परिसरातील घटना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ममदापूर** : राहाता तालुक्यातील वाकडी परिसरात ऐलम वस्ती भागात दत्तात्रय साबदे यांच्या गट नंबर ७१७ याठिकाणी कांद्याच्या शेतात काही दिवसापूर्वी आडगाव येथील मेंढपाळ पोपट वराडे व पत्नी मोनाली व मुलीसह मेंढ्या चारण्यासाठी आले होते.गुरुवारी (दि. ७) मे रोजी घटना रात्री दोन वाजेच्या सुमारास कळपाशेजारी झोपलेले होते. त्यावळी पत्नी मोनाली हिचयावर बिबटचाने अचानक हल्ला करून तिला जखमी केल्याची घटना घडली. बिबट्याने हल्ला केल्याने महिलेच्या कपाळावर जखमा झाल्या आहेत. रात्रीची वेळ रानशिवार असल्याने दवाखान्यात जाता आले नाही. दुसऱ्यादिवशी सकाळी स्वखर्चाने खंडाळा येथे उपचारासाठी नेण्यात आले. सदर महिलेने उपचार घेऊन पुन्हा अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आले येथे त्यांच्यावर उपचार करण्यात आले. या परिसरात गेल्या कित्येक वर्षापासून बिबट्याचा त्रास शेतकरी वर्गाला सहन करावा लागत आहेत. काही दिवसांपूर्वी पुन्हा याच भागात एका मेंढपाळावर बिबट्याने हल्ला केला होता. याच परिसरातील शेळ्या, बकरे, व कुत्रे बिबट्याने फस्त केली. वनविभागाच्या या परिसरात पिंजरे बसविण्यात यावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली. शासनाने सदरच्या कुटुंबियांना मदत करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली.



# आधी रस्ता नांगरला, त्यानंतर आत्महत्येचा व्हिडीओ केला व्हायरल!

## मंत्री विखे पाटलांना उंबरी बाळापूर ग्रामस्थांचे निवेदन; आज गाव बंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आश्वी । झरेकाठी** : सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, दबावाचे राजकारण आणि खोट्या आरोपांच्या विरोधात उंबरी बाळापूर (ता. संगमनेर) येथील ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. सार्वजनिक रस्ता नांगरून काढणाऱ्या आणि गावातील सामाजिक कार्यकर्त्यांची नाहक बदनामी करणाऱ्या व्यक्तीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी ग्रामस्थांनी जलसंपदा तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांना एक सविस्तर निवेदन दिले असून पालकमंत्र्यांनी कारवाई करण्याच्यां सूचना दिल्या आहेत.

जोर्वे-उंबरी बाळापूर-कोल्हार या जिल्हा मुख्य मार्ग क्रमांक २१ चे काम सुरू असताना, गुरुवार दि. ७ मे २०२६ रोजी महेश उर्फ छोट्या अनिल सरोदे याने प्रवरा डाव्या



कालव्यालगत असलेला सार्वजनिक रस्ता नांगरून टाकला. विशेष म्हणजे, रस्ता नांगरताना त्याने कालव्याच्या भरावलाही धक्का लावल्याने कालव्याच्या स्थैर्याला मोठा धोका निर्माण झाला असून तो फुटण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. तसेच यामुळे रस्ते अपघाताची शक्यता वाढून मानवी जीविताला धोका निर्माण झाला आहे. सदर रस्ता नांगरताना काही स्थानिक नागरिकांनी त्याला विरोध केला असता, त्याने मी कोणालाही भीत नाही असे म्हणत उपस्थित लोकांना शिवीगाळ केल्याचे निवेदनात म्हटले आहे.

तर, या धक्कादायक घटनेची माहिती मिळताच पाटबंधारे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने सविस्तर पाहणी केली असून, आश्वी पोलीस स्टेशनमध्ये संबंधित व्यक्ती विरूध्द गुन्हा (रजि. नं. ९५/२०२६) दाखल करण्यात आला आहे. मात्र, गुन्हा दाखल झाल्यापासून ती व्यक्ती पसार असून तो सोशल मीडियाच्या माध्यमातून गावाला वेठीस धरण्याचे व दबाव तंत्राचा वापर करण्याचे काम करत आहे. शुक्रवार दि. ८ मे रोजी त्याने गावातील एका व्हॉट्सअप ग्रुपवर सायंकाळी आठ वाजेच्या सुमारास आत्महत्येची धमकी देणारा एक व्हिडिओ प्रसारित केला. यामध्ये त्याने रामभाऊ भुसाळ, सरूनाथ उंबरकर, गणेश भुसाळ, नानासाहेब उंबरकर, निलेश निर्मळ, संदीप भुसाळ आणि अतुल भुसाळ यांच्या नावांचा उल्लेख केला.

मात्र या प्रकरणाशी कोणताही संबंध नसताना त्यांची नावे घेऊन त्यांना नाहक गोवण्याचा प्रयत्न केल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच, त्या व्यक्तीने रासायनिक औषध प्राशन करुन गावच्या सरपंच अर्चना भुसाळ, सुभाष भुसाळ यांच्या समवेत रामभाऊ भुसाळ यांच्या वस्तीवर जाऊन त्यांना धमकावण्याचा आणि दडपशाही करण्याचा प्रयत्न केला. मात्र, घटनेप्रसंगी रामभाऊ भुसाळ हे अनिल बर्डे यांच्या समवेत आश्वी पोलीस स्टेशन येथे कामानिमित्त उपस्थित होते. त्यामुळे या घटनेचा उंबरी बाळापूर ग्रामस्थांनी निषेध केला आहे.

तो व्यक्ती पसार असताना त्याला कोणी आश्रय दिला? व्हिडिओ तयार करण्यास कोणी मदत केली? आणि त्याला अशा कृत्यासाठी कोणी प्रवृत्त केले? याची सखोल चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांनी निवेदनात केली आहे. विशेषतः घटनेच्या दोन दिवसांपूर्वी संगमनेरमधील एका हॉस्पिटलमध्ये जाऊन काही व्यक्तींनी हे षडयंत्र रचल्याचा गंभीर आरोपही देखील निवेदनात करण्यात आला असून आरोपीच्या मोबाइलचे सीडीआर तपासून सर्व सूत्रधारांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच, या घटनेचा निषेध करण्यासाठी आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आज रविवार दि. १० मे रोजी उंबरी बाळापूर गाव बंद ठेवून निषेध सभा घेण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. या निवेदनाच्या प्रती संगमनेरचे तहसीलदार धीरज मांजरे, आश्वीचे सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांना देण्यात येणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी चर्चा करताना रामभाऊ भुसाळ, सरुनाथ उंबरकर, अशिष शेळके, ॲड. रवींद्र शेळके यांच्यासह ग्रामस्थांनी मागील काही दिवसांची वस्तुस्थिती मांडली. यानंतर, पालकमंत्र्यांनी पोलीस प्रशासन आणि संबंधित विभागाला तात्काळ चौकशी करून नियमानुसार योग्य त्या कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत.